दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३४४ । सोमवार २८ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## आसाममध्ये सीजेपीच्या बैठकीपूर्वी नेते, कार्यकर्ते ताब्यात

**गुवाहाटी :** आसामची राजधानी गुवाहाटी येथे कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) नियोजित प्रादेशिक स्वयंसेवक बैठकीपूर्वीच पक्षाचे सहसंयोजक आशुतोष रांका यांच्यासह अनेक नेते व स्वयंसेवकांना आसाम पोलिसांनी ताब्यात घेतले. रविवारी होणाऱ्या या बैठकीसाठी कार्यकर्ते एकत्र येण्यापूर्वीच पोलिसांनी कार्यक्रमस्थळाकडे जाणारे मार्ग अडवल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे या कारवाईवर आक्षेप घेतला. आशुतोष रांका आणि सीजेपीच्या पथकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन अज्ञात ठिकाणी नेल्याचा दावा त्यांनी केला. रांका व त्यांचे सहकारी आसाममधील स्वयंसेवकांची छोटी बैठक घेण्यासाठी जात असताना त्यांना ताब्यात घेण्यात आल्याचे दिपके यांनी म्हटले आहे. पक्षाच्या माहितीनुसार, रांका यांच्यासह अंकित भारद्वाज, प्रेम आकाश यांच्यासह अन्य नेते व स्वयंसेवकांना गुवाहाटीतील पोलिसांच्या एका केंद्रात नेण्यात आले. पक्षाने ही बैठक शांततापूर्ण असल्याचे सांगितले आहे. या बैठकीसाठी सुमारे २०० ते ३०० स्वयंसेवकांना एकत्र करण्याचे नियोजन असल्याचेही वृत्त आहे.

### महत्त्वाचे..

**नेपाळमध्ये पुन्हा पावसाचा कहर; सहा जणांचा मृत्यू**

काठमांडू : मुसळधार पावसासह आलेल्या पूर आणि भूस्खलनामुळे नेपाळमधील परिस्थिती गंभीर बनली आहे. विविध भागांत झालेल्या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. बागलुंग जिल्ह्यात भूस्खलनामुळे एक घर ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या दुर्घटनेत एका महिलेसह तिच्या तीन मुलांचा मृत्यू झाला. पाल्पा जिल्ह्यातही दोघांचा मृत्यू झाला आहे. पूर आणि भूस्खलनामुळे अनेक घरे व पूल वाहून गेले असून, विविध ठिकाणी म हामार्ग बंद झाल्याने वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. बुटवलमधील पूरग्रस्त भागातून हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. अनेक भागांत बचाव व मदतकार्य सुरू असून, पावसाचा जोर कायम असल्याने प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# कट्टर विरोधक एकवटले

## अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचाली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचालींना वेग आला असून, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीचा खर्च व राजकीय संघर्ष टाळून सहकार क्षेत्राच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांनी घेतली आहे. याच पार्श्वभूमीवर संगमनेर येथे रविवारी सर्वपक्षीय नेते, लोकप्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांची बैठक झाली.**

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सकारात्मक भूमिका**

**राजकीय मतभेद बाजूला ठेवण्याचे आवाहन**

बँक ही शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची असल्याने तिची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सामंजस्याने प्रयत्न करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. यापूर्वीही जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा राहिली असून, त्याच धर्तीवर यंदाही सर्वांनी एकत्र येण्याची भूमिका मांडण्यात आली. काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले होते. बैठकीस माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार आशुतोष काळे, संग्राम जगताप, हेमंत ओगले, विवेक कोल्हे, विक्रम पाचपुते, प्राजक्त तनपुरे, काशिनाथ दाते, अक्षय कर्डिले यांच्यासह विविध नेते उपस्थित होते.



आमदार मोनिका राजळे व माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांनी ऑनलाइन सहभाग घेतला.बैठकीला अनुपस्थित असलेल्या नेत्यांशी संपर्क साधून त्यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे आता जागावाटप व उमेदवारीबाबतची पुढील चर्चा कशी होते, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. अंतिम निर्णयानंतरच निवडणूक बिनविरोध होणार की निवडणुकीची प्रक्रिया पुढे जाणार, हे स्पष्ट होणार आहे.

# टाकळीभानचा अस्लम इनामदार पुन्हा आशियाचा 'सुवर्णवीर'!

## अंतिम सामन्यात इराणवर ४०-३४ ने मात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** टाकळीभान च सुपुत्र आणि भारतीय कबड्डीपटू अस्लम मुस्तफा इनामदार याने पुन्हा एकदा आपल्या गावाचे, श्रीरामपूर तालुक्याचे आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल केले आहे. जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष कबड्डी संघाने सुवर्णपदक पटकावले. या सुवर्णविजेत्या संघाचा अस्लम इनामदार हा महत्त्वपूर्ण सदस्य आहे.



२६ सप्टेंबर रोजी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य इराणचा ४०-३४ असा पराभव करत सुवर्णपदकावर पुन्हा नाव कोरले. पहिल्या अर्ध्यात इराणने १८-१७ अशी आघाडी घेतली होती. मात्र, दुसऱ्या अर्ध्यात भारतीय खेळाडूंनी आक्रमणासोबतच बचावातही दमदार कामगिरी करत सामन्याचे पारडे फिरवले.

विशेष म्हणजे, अस्लमचे हे सलग दुसरे आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक ठरले आहे. यापूर्वी हांगझोऊ येथे झालेल्या स्पर्धेतही तो सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा सदस्य होता. हांगझोऊनंतर आयची-नागोया येथेही सुवर्णपदक जिंकत त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपली सातत्यपूर्ण कामगिरी अधोरेखित केली. युवा पलटण ते भारतीय संघ असा अस्लमचा प्रेरणादायी प्रवास आहे. २०१८ मध्ये पुणेरी पलटणच्या युवा अकादमीत प्रवेश केल्यानंतर त्याने कठोर प्रशिक्षण घेतले. २०२१ मध्ये प्रो कबड्डी लीगमध्ये पुणेरी पलटणकडून पदार्पण करत त्याने चढाई आणि बचावातील अष्टपैलू खेळाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. पुढे त्याच्यावर पुणेरी पलटणचे कर्णधारपदही सोपविण्यात आले.राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना अस्लमने २०२२ मधील वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक मिळविणाऱ्या महाराष्ट्र संघात योगदान दिले. ग्रामीण भागातील टाकळीभानच्या मातीतून भारतीय कबड्डीच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचलेल्या अस्लमच्या या कामगिरीने टाकळीभानसह श्रीरामपूर तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सलग दोन आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा भाग होण्याचा मान मिळविणाऱ्या अस्लमवर क्रीडाप्रेमी व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पहाटेचा 'माती'चा खेळ पोलिसांनी उधळला

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील पिसोरे-लोणी शिवारातील प्रस्तावित एमआयडीसीच्या जागेतून बेकायदेशीरपणे माती उत्खनन करून तिची वाहतूक करणाऱ्या डंपरवर पहाटे साडेतीनच्या सुमारास बेलवंडी पोलिसांनी कारवाई करत मातीने भरलेले चार डंपर जप्त केले असून, वाहनांसह एकूण १ कोटी ४० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चार डंपरसह १.४० कोटींचा मुद्देमाल जप्त...**

बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुम ार सोनवलकर यांना पिसोरे-लोणी शिवारातील एमआयडीसीच्या नियोजित जागेतून मातीचे उत्खनन करून डंपरमधून वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी चिंभळे गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. **(पान ४ वर)**



# पुढचा मान्सूनही धोक्यात!

## एल निनोचा प्रभाव वाढल्यास अडचणी वाढणार; मुख्यमंत्री फडणवीसांचा सावधगिरीचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर :** राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' दुष्काळ जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रासमोरील पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के भाग दुष्काळाच्या छायेत असताना, पुढील वर्षीही मान्सूनवर परिणाम करणाऱ्या एल निनोचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचे नियोजनही आतापासूनच करावे लागणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी नागपुरात पत्रकार परिषदेत एल निनोच्या संभाव्य परिणामांबाबत राज्याला सावध केले. सध्या सक्रिय असलेला एल निनो फेब्रुवारीमध्ये शिखरावर पोहोचण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली असून, त्यानंतर त्याचा प्रभाव कमी होण्याची साधारण परिस्थिती असते. मात्र, एल निनोचा प्रभाव वाढल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीसाठी राज्याने सर्व प्रकारची तयारी ठेवली पाहिजे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

- **७५ टक्के – महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत**
- **२६५– दुष्काळ जाहीर झालेले तालुके**
- **७५%– दुष्काळग्रस्त घोषित झालेला राज्याचा भाग**
- **ट्रिगर– १ दुष्काळी परिस्थितीचे प्राथमिक निकष पूर्ण**
- **पुढचे आव्हान – शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन**
- **हवामानाचा धोका– एल निनोचा संभाव्य प्रभाव वाढणार**

पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानातील वाढीशी एल निनोचा संबंध असून, त्याचा जागतिक हवामानावर परिणाम होऊ शकतो. भारताच्या मान्सूनवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रासाठीही आगामी काळ महत्त्वाचा ठरणार आहे. राज्य सरकारने शनिवारी महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' दुष्काळ जाहीर केला आहे. त्यामुळे राज्याच्या सुमारे ७५ टक्के भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाच्या विविध उपाययोजनांची अंमलबजावणी होणार आहे.मात्र, यंदाच्या पाणी उपलब्धतेचा विचार करता आगामी काळात शेतीसाठी सिंचनाचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि ग्रामीण तसेच शहरी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. त्यातच पुढील मान्सूनबाबत एल निनोचे सावट **(पान ४ वर)**

# शेगाव संस्थानची दुष्काळग्रस्तांसाठी १ कोटी ११ लाखांची मदत

## साई संस्थाननेही मदतीसाठी पुढाकार घ्यावा : कैलास बापू कोते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** अल्प पर्जन्यमानामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना, शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ कोटी ११ लाख रुपयांची मदत देत सामाजिक बांधिलकी जपली आहे. शेगाव संस्थानच्या या पुढाकाराचे शिर्डी नगरपंचायतीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते यांनी स्वागत केले असून, शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थाननेही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भरीव योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**'हीच खरी साईसेवा'**

**शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानने दुष्काळग्रस्तांसाठी १ कोटी ११ लाख रुपये देऊन मानवतेचा आदर्श निर्माण केला आहे. शेतकरी हा खरा साईभक्त आहे. 'सबका मालिक एक' ही साईबाबांची शिकवण संकटात सापडलेल्या माणसाच्या पाठीशी उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळे साईबाबा संस्थाननेही दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला भरीव मदत द्यावी, ही एक साईभक्त म्हणून माझी अपेक्षा आहे.**

**– कैलास बापू कोते, प्रथम नगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत**

दुष्काळामुळे शेतकऱ्यांसमोर शेतीपिकांचे नुकसान, पिण्याचे पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत धार्मिक संस्थांनी सामाजिक बांधिलकीतून मदतीचा हात पुढे करणे महत्त्वाचे आहे. शेगाव संस्थानने घेतलेला निर्णय त्यादृष्टीने प्रेरणादायी असल्याचे कोते यांनी म्हटले.

शिर्डीचे श्री साईबाबा संस्थान लाखो भाविकांच्या श्रद्धा आणि देणगीतून उभे राहिले आहे. महाराष्ट्रातील शेतकरी हा साईबाबांचा खरा भक्त असून, संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी साईसेवा आहे. त्यामुळे संस्थानने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दुष्काळाच्या व्याप्तीला साजेशी भरीव मदत जाहीर करावी, अशी कळकळीची मागणी कोते यांनी केली.

साईबाबा संस्थानने यापूर्वीही विविध आपत्तींच्या काळात मदत केली आहे. निधी वितरणासाठी आवश्यक न्यायालयीन व शासकीय प्रक्रियाही पार पाडावी लागते. मात्र, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी संस्थानने सकारात्मक पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भिंगारला २ एफएसआय मंजूर

## बांधकामाच्या मर्यादा शिथिल होण्याचा मार्ग मोकळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** भिंगार कँटोन्मेंट परिसरातील नागरिकांच्या वर्षानुवर्षांपासून प्रलंबित असलेल्या एफएसआयच्या प्रश्नाला अखेर दिशा मिळाली आहे. भिंगार कँटोन्मेंट बोर्डाच्या कार्यक्षेत्रात २ एफएसआयला मंजुरी देण्यात आली असून, संरक्षण मंत्रालयाकडून यासंदर्भातील सुधारित राजपत्र अधिसूचना जारी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा शिथिल होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हजारो मालमत्ताधारकांना याचा लाभ होणार आहे.

या निर्णयासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ७ डिसेंबर २०२३ रोजी लोकसभेत भिंगार कँटोन्मेंटमधील नागरिकांच्या समस्यांचा मुद्दा उपस्थित केला होता. सुमारे २५ हजार नागरी लोकसंख्या असलेल्या भिंगारमध्ये एफएसआयची मर्यादा, बांधकाम परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्र, पाणीपुरवठा तसेच केंद्राच्या योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. **(पान ४ वर)**

# दुष्काळात साधेपणाने विवाह करा; SRA, SIR वरून राजकारण नको

## चारा टंचाईवर उपाययोजनांचा विचार; पशुपालकांना थेट ऑनलाइन अनुदान देण्याचा पर्याय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राज्यात अनेक भागांत पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून खरीप पिकांवर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. या संकटाच्या पार्श्वभूमीवर विवाह सोहळ्यांमधील अनावश्यक खर्च आणि डामडौल टाळून साध्या पद्धतीने विवाह करण्याचे आवाहन जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पत्रकारांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी आपण समाजाला जे सांगतो, ते स्वतःच्या आचरणातूनही दाखवून देणे आवश्यक आहे. कोरोना काळात ५० ते १०० लोकांच्या उपस्थितीत साध्या पद्धतीने विवाह सोहळे पार पडले होते. त्याचप्रमाणे यंदाही विवाह सोहळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारा अनावश्यक खर्च टाळण्याची गरज आहे. केवळ विवाहच नव्हे, तर हळदी समारंभांमध्येही मोठ्या प्रम णावर खर्च केला जात असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. दुष्काळाच्या



काळात यावर्षी तरी अनावश्यक खर्च आणि मोठेपणा टाळून परिस्थितीला सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

**SRAच्या विषयावरून राजकारण नको**

SRAच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांवरही विखे पाटील यांनी भाष्य केले. संबंधित फाईल आपल्या खात्याकडे आल्यानंतर सर्व संबंधितांनी एकत्र बसून त्यातील अडचणी तपासल्या. त्यानंतर त्याबाबत निर्णय घेण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच निवडणूक आयोगाच्या प्रस्तावावर तिन्ही सदस्यांची सहमती असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे या विषयावरून राजकारण करण्यापेक्षा वस्तुस्थिती समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**चारा टंचाईवर उपाययोजनांचा विचार**

पावसाअभावी शेतीबरोबरच पशुधनावरही संकट निर्माण झाले आहे. अनेक भागांत चारा टंचाईचा प्रश्न गंभीर होत असून पशुपालकांना जनावरे विकण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासन उपाययोजनांचा विचार करीत असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. **(पान ४ वर)**

# गोवा निवडणुकीचा 'कौल' कुणाला..?

## सत्ता, विकास, पर्यावरण आणि गोमंतकीय अस्मितेच्या संघर्षात रंगणार २०२७ चे रणांगण




गोवा म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहते ते निळाशार समुद्र, हिरवाईने नटलेले डोंगर, नारळी-पोफळीच्या बागा, पर्यटनाची लगबग आणि मोकळ्या मनाचा गोमंतकीय समाज. अवघ्या सोळा लाखांच्या आसपास लोकसंख्या असलेले हे छोटे राज्य क्षेत्रफळाने लहान असले, तरी त्याचे राजकीय आणि सांस्कृतिक महत्त्व मोठे आहे. महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या गोव्याचे महाराष्ट्राशी केवळ भौगोलिक नाते नाही, तर भाषा, संस्कृती, व्यापार, पर्यटन आणि सामाजिक संबंधांचेही घट्ट बंध आहेत. त्यामुळे २०२७ मध्ये होऊ घातलेली गोव्याची विधानसभा निवडणूक ही गोव्यापुरती मर्यादित न राहता महाराष्ट्रासाठीही लक्षवेधी ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीला अजून काही महिने असले तरी गोव्याच्या राजकीय वातावरणात आतापासूनच हालचाली वाढल्या आहेत. सत्ताधारी भाजप आपली सलग सत्ता कायम ठेवण्यासाठी तयारीला लागला आहे, तर काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि प्रादेशिक राजकीय शक्ती भाजपविरोधातील राजकीय अवकाश मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. गोव्याच्या राजकारणाचे वैशिष्ट्य असे की, येथे राष्ट्रीय पक्षांइतकाच स्थानिक नेतृत्वाचा आणि प्रादेशिक पक्षांचा प्रभावही महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे आगामी निवडणुकीत कोण कोणासोबत राहणार आणि मतदानाच्या दिवशी कोणते समीकरण प्रत्यक्षात उतरणार, याकडे सर्वांचे लक्ष असेल.

आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल गोव्यात सातत्याने येत आहेत. पक्षाचा विस्तार करण्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवर जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आतिशी यांचीही गोव्यातील सक्रियता वाढली आहे. आपकडे सध्या दोन आमदार असले, तरी राज्यात पक्षाला अजून व्यापक जनाधार निर्माण करायचा आहे. विजय सरदेसाई यांच्या गोवा फॉरवर्ड पक्षासोबत आपची आघाडी झाल्याने विरोधकांच्या राजकारणाला नवे परिमाण मिळाले आहे. मात्र, गोव्याच्या राजकारणात आघाडी करणे जितके सोपे, तितके ती निवडणुकीपर्यंत टिकविणे सोपे नसते. जागावाटप, स्थानिक नेतृत्व, उमेदवार आणि मतदारसंघनिहाय समीकरणे यावर या आघाडीचे भवितव्य अवलंबून राहील.

दुसरीकडे काँग्रेसने 'गोंय राखण यात्रा' सुरू करून गोव्याच्या मूलभूत प्रश्नांना राजकीय अजेंड्यावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. जल, जमीन आणि जंगल या मुद्द्यांभोवती ही यात्रा फिरत आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांचा सहभाग आणि त्यापूर्वी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा गोवा दौरा यावरून राष्ट्रीय काँग्रेसनेही गोव्याकडे गांभीर्याने लक्ष दिल्याचे दिसते. यात्रेत केवळ काँग्रेस कार्यकर्तेच नव्हे, तर पर्यावरण, वारसा आणि गोव्याच्या सांस्कृतिक अस्मितेबाबत चिंता व्यक्त करणारे विविध घटक सहभागी होत असल्याचे चित्र आहे. ही बाब निवडणुकीच्या दृष्टीने लक्षवेधी आहे.

गोव्याच्या राजकारणात आज सर्वांत मोठा प्रश्न केवळ 'कोण सत्तेत येणार?' हा नाही. त्यापेक्षा 'गोव्याचा विकास नेमका कोणत्या दिशेने जाणार?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरत आहे. पर्यटन हा गोव्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पर्यटनामुळे रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होतात. देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांमुळे गोव्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागतो. परंतु पर्यटनाच्या विस्ताराबरोबर वाढणारे बांधकाम, जमिनींचे वाढते व्यवहार, काँक्रीटीकरण, पाणी आणि कचरा व्यवस्थापनाचे प्रश्न आणि पर्यावरणावरील ताण याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

गोमंतकीय जनतेच्या मनात आपल्या जमिनीबाबत आणि आपल्या राज्याच्या मूळ स्वरूपाबाबत निर्माण झालेली चिंता निवडणुकीच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे. बाहेरील गुंतवणूक आणि स्थानिक हक्क यांच्यात समतोल साधण्याचे आव्हान सरकारसमोर आहे. विकासाला विरोध करणे हा मार्ग नाही; पण विकासाच्या नावाखाली स्थानिक समाज, पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा यांची किंमत मोजावी लागणार नाही, याची काळजी घेणेही तेवढेच आवश्यक आहे. गोव्याचा अनुभव महाराष्ट्रासाठीही महत्त्वाचा आहे. कोकणात पर्यटन, मोठे प्रकल्प, जमिनींचे व्यवहार आणि पर्यावरण या विषयांवर जे प्रश्न निर्माण होत आहेत, त्यांचे प्रतिबिंब गोव्याच्या अनुभवात दिसते.

या सगळ्याबरोबरच मतदारयादीचा मुद्दा निवडणुकीपूर्वी अत्यंत संवेदनशील बनला आहे. गोव्याच्या मतदारयादीतून मोठ्या संख्येने नावे कमी झाल्याच्या मुद्द्यावर काँग्रेसने प्रश्न उपस्थित केले आहेत. काही मतदारांच्या नावांबाबत निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींचे मुद्देही समोर आले आहेत. निवडणूक आयोगाने मात्र राजकीय आरोपांना विरोध केला असून मतदारयादीच्या पुनरीक्षणाची प्रक्रिया नियमानुसार झाल्याचे स्पष्ट केले आहे. मतदारयादी अद्ययावत करणे ही निवडणूक व्यवस्थेची नियमित प्रक्रिया असली, तरी पात्र मतदाराचे नाव कोणत्याही कारणाने वगळले जाणार नाही, याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

लोकशाहीत मतदानाचा अधिकार हा केवळ एका यादीतील नाव नसतो; तो नागरिकाच्या अस्तित्वाचा आणि सहभागाचा महत्त्वाचा भाग असतो. त्यामुळे मतदारयादीबाबत कोणतीही शंका निर्माण झाली तर ती पारदर्शकपणे दूर करणे हे निवडणूक यंत्रणेच्या विश्वासार्हतेसाठी आवश्यक आहे. या मुद्द्यावर राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा तथ्य आणि अधिकृत प्रक्रियेला महत्त्व मिळाले पाहिजे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा गोवा दौरा आणि भाजपच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन यामुळे सत्ताधारी पक्षानेही निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. २०१२ पासून भाजपने गोव्यात आपले राजकीय वर्चस्व कायम ठेवले आहे. मनोहर पर्रीकर यांच्या निधनानंतरही पक्षाने सत्ता टिकविली. त्यामुळे आगामी निवडणुकीत भाजपसमोर सत्ता टिकविण्याचे, तर विरोधकांसमोर प्रभावी पर्याय उभा करण्याचे आव्हान आहे.

गोव्याची निवडणूक कोण जिंकेल, याचा अंदाज बांधण्यापेक्षा या निवडणुकीत कोणते प्रश्न निर्णायक ठरतात हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण गोव्याचा प्रश्न केवळ मुख्यमंत्री कोण होणार, एवढाच नाही. गोव्याची जमीन कोणाच्या हितासाठी वापरली जाणार? पर्यटनाचा फायदा स्थानिकांना किती मिळणार? पर्यावरणाचे संरक्षण कसे होणार? रोजगाराच्या संधी स्थानिक तरुणांना किती मिळणार? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गोव्याची सांस्कृतिक ओळख आणि गोमंतकीय अस्मिता विकासाच्या प्रवाहात अबाधित राहणार का?याच प्रश्नांची उत्तरे आगामी निवडणुकीच्या राजकीय चर्चेला दिशा देतील. महाराष्ट्रासाठीही गोव्याचा हा प्रयोग महत्त्वाचा आहे. कारण सीमा वेगळी असली, तरी प्रश्न अनेक बाबतीत समान आहेत. गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यापासून महाराष्ट्राच्या कोकणापर्यंत विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोलाचा प्रश्न उभा आहे.

म्हणूनच २०२७ ची गोवा विधानसभा निवडणूक ही केवळ सत्तेची लढाई नसेल. ती विकासाच्या मॉडेलची, स्थानिक अस्मितेची, पर्यावरणाच्या भवितव्याची आणि लोकशाहीवरील विश्वासाचीही परीक्षा असेल. गोव्याचा मतदार कोणता कौल देतो, हे भविष्यात समोर येईलच; पण त्या कौलापूर्वी राजकीय पक्षांनी गोव्याच्या जनतेसमोर एक प्रश्न स्पष्टपणे ठेवला पाहिजे, 'सत्ता कुणाची?' यापेक्षा 'गोवा कसा असावा?' याचे उत्तर काय?

कारण गोवा केवळ पर्यटनाचे ठिकाण नाही; तो एक समाज, एक संस्कृती आणि एक जीवनपद्धती आहे. गोव्याची निवडणूक म्हणूनच छोट्या राज्याची मोठी राजकीय परीक्षा ठरणार आहे. आणि तिचे पडसाद महाराष्ट्रातही उमटणार आहेत.

# प्रा. विनोद बाबर यांच्या व्याख्यानाला नेवासकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जनसेवक स्वर्गीय राजेंद्र मापारी व त्यांच्या पत्नी नगरसेविका सौ. सीमाताई राजेंद्र मापारी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नेवासा येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात प्रसिद्ध व्याख्याते प्रा. विनोद बाबर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाला नेवासकर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आई-वडिलांचा जो सन्मान करतो, त्याचाच जग सन्मान करते. त्यामुळे आई-वडिलांना जपा, असे आवाहन प्रा. बाबर यांनी केले.

चांगल्या-वाईट प्रसंगी आई-वडीलच खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे राहतात. आजच्या काळात आई-वडिलांचे महत्त्व मुलांना कळत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. युवा पिढीने जीवनात यशस्वी होण्यासाठी आपली संगत तपासावी, आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांची शिदोरी जपावी आणि आपल्या शरीररूपी संपत्तीची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

स्वर्गीय राजेंद्र मापारी यांनी समाजात चांगली कर्मे केल्यामुळेच त्यांच्या स्मरणार्थ मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिले. त्यांनी माणसांच्या हृदयात स्थान निर्माण केले होते, असे प्रा. बाबर यांनी नमूद केले.यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, सुनीताताई गडाख, नंदकुमार पाटील, महंत बालयोगी ऋषिनाथ महाराज, महंत धनंजय मुनी, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, पोलीस निरीक्षक प्रतापराव दराडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मापारी दाम्पत्याला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिरेगाव वि का सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा:** तालुक्यातील शिरेगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या व संचालक मंडळींच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.सोसायटीच्या गोडाऊनमध्ये ही सभा घेण्यात आली. या सभेत विषय पत्रिकेवरील १ ते १३ विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. ही सभा सोसायटीचे अध्यक्ष धनराज तुवर, उपाध्यक्ष चंद्रभान बोर्डे, सचिव शिवाजी जंगले आणि सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी झालेल्या सभेप्रसंगी सभासद सुरेश गिताराम जाधव यांनी सोसायटीच्या डुप्लिकेट लेटर पॅडवर खोटे शिक्के तयार करून चेअरमन व सचिव यांच्या बनावट सह्या केल्या, सोसायटीचा बोजा कमी करून इतर बँकेचे कर्ज घेऊन सोसायटीची फसवणूक केली असल्याचा आरोप केला

तसेच सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना धमकी देणे, कर्मचाऱ्यांना फोन लावून त्याचे रेकॉर्डिंग करणे व ते रेकॉर्डिंग सोशल मीडियावर प्रसिद्ध करणे, सोसायटीची व सभासदांची बदनामी होईल असा मजकूर सोशल मीडियावर टाकणे आणि सोसायटीच्या विरोधात वेळोवेळी विनाकारण तक्रार अर्ज देणे, अशा स्वरूपाचे गैरकृत्य केल्याचे निदर्शनास आल्या

या कारणास्तव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ३५ अन्वये सुरेश गिताराम जाधव यांचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. तसेच, काही सभासद दोन ठिकाणी संस्थेत सभासद असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचेही सभासदत्व बहुमताने रद्द करण्यात आले.किरकोळ वाद वगळता संपूर्ण सर्वसाधारण सभा सुरळीत पार पडली. उपस्थित सभासदांचे आभार सोसायटीचे तज्ज्ञ संचालक डॉ. रमेश जाधव यांनी मानले.

# खोट्या आंदोलनांचा खेळ उघड'; रमेश काळेंची थोरातांवर टीका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** :संगमनेर तालुक्यात वीज प्रश्नावरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावर टीका केली. थोरात यांच्या ४० वर्षांच्या सत्ताकाळात तालुक्याचा विकास थांबला होता, असा आरोप करत निवडणुकीतील पराभवानंतर वीज प्रश्नावर आंदोलनाची आठवण झाली, अशी टीका काळे यांनी केली.

काळे म्हणाले, सत्तेत असताना शेतकऱ्यांना वीज वितरणाचे रोहित्र मिळविण्यासाठी पैसे द्यावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत माहिती अधिकारातून मागील काळातील व आजच्या वीज उपकेंद्रांची माहिती तपासावी, असे आव्हानही त्यांनी दिले.संगमनेर शहराची वाढती वीज गरज लक्षात घेऊन आमदार अमोल खताळ यांनी वाढीव ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करून आणले आहे. त्यासाठी नऊ गुंठे जागेची मागणी करण्यात आली असून जागा उपलब्ध असतानाही ती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप काळे यांनी केला. या प्रश्नावर माजी आमदारांनी नगराध्यक्ष असलेल्या आपल्या सुनेविरोधात तसेच पदवीधर आमदाराविरोधात आंदोलन का केले नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.संगमनेरमध्ये वीज, पाणी व रस्त्यांची कामे वेगाने सुरू असून नवीन उपकेंद्रांची कामेही मार्गी लागत आहेत, असा दावा काळे यांनी केला. राजकीय मुद्दे उरणार नसल्याच्या भीतीने आंदोलनांचे राजकारण केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.



दरम्यान, २२ सप्टेंबर रोजी बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली वीज, पाणी व दुष्काळाच्या प्रश्नावर संगमनेरमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

# ज्ञानाची शिदोरीच आयुष्याची खरी कमाई : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** :आजचे युग हे स्पर्धा, तंत्रज्ञान आणि माहितीचे आहे. या काळात केवळ परीक्षेतील गुणांपेक्षा विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि विचारशक्ती आत्मसात करणे अधिक महत्त्वाचे आहे. पैसा, संपत्ती आणि भौतिक साधने काळानुसार कमी-जास्त होऊ शकतात; मात्र ज्ञानाची शिदोरी ही आयुष्यभर साथ देणारी आणि कधीही चोरीला न जाणारी संपत्ती आहे. ज्ञानामुळे व्यक्तीला आत्मविश्वास आणि जीवनातील आव्हानांवर मात करण्याचे सामर्थ्य मिळते. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या शिक्षणाच्या संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांचे ज्ञान आत्मसात करावे आणि या ज्ञानाच्या बळावर आपले भविष्य घडवावे असे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी



केले.कोपरगाव तालुक्यातील चासनळी येथील रयत शिक्षण संस्थेच्या मारुतीराव दगडूजी तिडके पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मा.खा.स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वाढीसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांचा हा वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी अविरतपणे पुढे नेला. पद्मविभूषण शरदचंद्र पवार व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या आशीर्वादाने मला देखील उत्तर विभागाची जबाबदारी मिळाली.

ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून रयत शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले.काळे परिवाराची रयत शिक्षण संस्थेशी असलेला ऋणानुबंध आणि बांधिलकी यापुढेही कायम ठेवत रयत शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालयाच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी मायभूमी सोशल फाउंडेशन, आधार फाउंडेशन व कृष्णा चांदगुडे यांच्या वतीने गुणवंत, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. तसेच उद्योजक विनोदजी आहिरे यांनी शाळेसाठी २१ हजार रुपयाच्या खुर्च्या भेट दिल्या. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप करण्यात आले. तसेच रांगोळी प्रदर्शन व ए.आय. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांचे शुभहस्ते करण्यात आले.

# दहेगाव बोलक्याचे सरपंच भारत चौधरी यांचे पद अखेर रद्द

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील दहेगाव बोलका ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच भारत विठ्ठल चौधरी यांचे सरपंचपद तसेच ग्रामपंचायत सदस्यत्व अखेर रद्द करण्यात आले आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या सरपंचपदावर निवडून आल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ही कारवाई केली.दहेगाव बोलका ग्रामपंचायतीची २०२३ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली होती. या निवडणुकीत चौधरी यांची अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवरून लोकनियुक्त सरपंच म्हणून निवड झाली होती. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र, निर्धारित १२ महिन्यांच्या कालावधीत प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू झाली.या प्रकरणी पंकज अशोक गायकवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार दाखल केली होती. तक्रारीत जात प्रमाणपत्रासाठी चुकीची वंशावळ सादर केल्याचे आरोपही करण्यात आले होते. प्रकरणातील कागदपत्रे व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी २०२५ मध्ये अपात्रतेचा निर्णय दिला होता. अखेर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणावरून चौधरी यांचे सरपंचपद व ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आले. या कारवाईमुळे तालुक्यात राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

# श्रीराम साधना आश्रमात महंत सुनीलगिरी महाराजांच्या मौनव्रताची सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** मुकिंदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या बारा दिवसीय मौनव्रत व अनुष्ठानाची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. गणेशोत्सवानिमित्त १४ ते २६ सप्टेंबरदरम्यान हे अनुष्ठान करण्यात आले. भटकणारे चित्त एकाग्र करण्यासाठी मौनव्रत व अनुष्ठानाचा उद्देश असून, स्वतः मध्ये भगवंताचे दर्शन घेण्यासाठी जीवनात तप करावे, असे आवाहन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी यावेळी केले.



अनुष्ठानाची सांगता झाल्यानंतर उपस्थित सुवासिनींनी कुंकुमतिलक व पुष्पवृष्टी करून महंत सुनीलगिरीजी महाराजांचे स्वागत केले. सनई-तुतारीच्या मंगलवाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य प्रकाशगुरू मुळे यांच्यासह ब्रह्मवृंदांनी केले.

यावेळी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरीजी महाराज, साध्वी अक्का महाराज, महंत पंचमपुरीजी महाराज, साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य, माऊली आश्रमाचे महंत ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्यासह विविध संत-महंत, मान्यवर, सेवेकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

उपस्थित भाविकांमधून चिठ्ठ्या काढून निवड झालेल्यांना पूजेसाठी धार्मिक साहित्य भेट देण्यात आले. महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर बालाजी केटरर्सच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महिला भाविकांनी महंत सुनीलगिरीजी महाराजांचे संतपूजन करून दर्शन घेतले.

# एसटी आगारात 'राजमाता जिजाऊ'च्या पाच नव्या गाड्यांचे लोकार्पण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्याचे आ. लंघे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यानुसार अनंत चतुर्दशीच्या पावन पर्वावर नेवासा एसटी आगाराच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' या नावाने पाच नव्या एसटी बसगाड्यांचा समावेश करण्यात आला. या नव्या गाड्यांचे लोकार्पण नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले व नगरसेवक सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी झालेल्या एस टी बसेसच्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी शनिशिंगणापूर देवस्थानचे सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी उदयकुमार बल्लाळ, इंजिनियर सुनीलराव वाघ,जनसेवक श्रीपतराव दारुंटे यांच्या हस्ते गाडयांचे पूजन करण्यात येऊन प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अनिल ताके, शिवसेना विधानसभा तालुका प्रमुख भाऊसाहेब वाघ, आगार प्रमुख संदीप ढवळे यांच्यासह उपस्थित नगरसेवकांच्या हस्ते श्रीफळ वाढवून नवीन बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलतांना नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले म्हणाले प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या नव्या गाड्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. यावेळी झालेल्या बसेसच्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी आ. विठ्ठलराव लंघे यांचे सुनील मोरे, रामभाऊ केंदळे, पोपटराव जिरे, गट नेते नगरसेवक महेश लोखंडे, प्रविण सरोदे, निरंजन डहाळे, नगरसेवक अंकुश म्हस्के, कृष्णाभाऊ परदेशी, अनिल पवार, संदीप सरकाळे, भाजप मीडिया प्रमुख आदिनाथ पटारे, शिवसेनेचे शहर प्रमुख बंडू शिंदे,संजय मारकळी, सागर पवार, सचिन दारुंटे, वाहतूक नियंत्रक काका पोटे, कचरू वरदे, योसेफ गायकवाड, गणेश पिटेकर, गणेश कोटस्थाने, राकेश सोनवणे, अजय आव्हाड यांच्यासह प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकाराने पारंपरिक व्यवसायापलीकडे जाऊन नवे उत्पन्नाचे मार्ग शोधावेत : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** सहकारी संस्थांनी पारंपरिक व्यवसायापुरते मर्यादित न राहता विविध व्यवसायांच्या माध्यमातून उत्पन्नवाढीचे नवे मार्ग शोधण्याची गरज आहे. काळाची गरज ओळखून साकुरी येथे सुरू करण्यात आलेला सीएनजी पंप हा सहकारातील नव्या उपक्रमाचे उत्तम उदाहरण आहे. शिर्डीला येणाऱ्या साईभक्तांसह परिसरातील वाहनधारकांना याचा मोठा लाभ होणार असून, सीएनजीच्या वापरामुळे प्रदूषण कमी होऊन पर्यावरण संवर्धनास हातभार लागेल, असे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




आमदार राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतूक संस्थेच्या वतीने साकुरी येथे सुरू करण्यात आलेल्या सीएनजी पंपाचा शुभारंभ विखे पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, महंत उद्धव महाराज मंडलिक, संस्थेचे चेअरमन नंदकिशोर राठी, उपाध्यक्ष सुनील जाधव, नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, राहाता नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, सोपानराव शिरसाठ, ज्ञानेश्वर गोंदकर, मुकुंदराव सदाफळ, मच्छिंद्र थेटे, मकरंद गुणे, विजयराव लगड, भारत पेट्रोलियमचे अधिकारी प्रणव अभिषेक व अनिश मुतानीक आदी उपस्थित होते.विखे पाटील म्हणाले, वाढती वाहनसंख्या लक्षात घेता पर्यावरणपूरक इंधनाचा वापर वाढणे ही काळाची गरज आहे. सीएनजी वाहनांची संख्या वाढल्यास हवेतील प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. साकुरीतील पंप शिर्डीला येणाऱ्या भाविकांसाठीही सोयीचा ठरणार आहे. जिल्ह्यातील टंचाईच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धन व पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी सीएनजी प्रकल्प काळाची गरज असल्याचे सांगितले. महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी सहकारी संस्थांच्या लोकाभिमुख कारभाराचे कौतुक केले. प्रणव अभिषेक यांनी सीएनजी वापराबाबत मार्गदर्शन केले. सुनील जाधव यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.

# कर्मवीरांच्या विचारांनी शिक्षणाची चळवळ पुढे न्यावी : चंद्रकांत दळवी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसुधारक व शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर येथे जयंती सोहळा उत्साहात पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन तथा माजी सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व रयत शैक्षणिक संकुलाच्या प्रमुख मीनाताई जगधने यांनी अध्यक्षस्थान भूषविले.




चंद्रकांत दळवी म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभी केलेली रयत शिक्षण संस्था ही लोकांनी लोकांसाठी चालविलेली संस्था आहे. शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करण्याचे त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

आमदार रोहित पवार म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. मोठा त्याग व संघर्ष करून त्यांनी रयत शिक्षण संस्थेची उभारणी केली. त्यांच्या विचारांचा आदर्श आपल्या आचरणातून पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. रयत शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात मीनाताई जगधने म्हणाल्या, त्याग, सेवा आणि समर्पण ही कर्मवीरांची मूल्ये जपत त्यांचा विचार पुढे नेला पाहिजे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास आजही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी कर्मवीरांच्या विचारांचा आदर्श घेऊन ज्ञान, कौशल्य, स्वावलंबन व सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांनी केले. आभार प्राचार्य संजय कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. योगिता रांधवणे व डॉ. पौर्णिमा गुजर यांनी केले. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, पत्रकार व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## प्रा. साहेबराव गागरे यांची पीएच.डी.ला गवसणी



**राहुरी** : तालुक्यातील तांभेरे येथील प्रा. साहेबराव रंभाजी गागरे यांना पीएचडी प्राप्त झाली असून प्राध्यापक साहेबराव गागरे हे सध्या लोणी येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील( पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. डेटा सायन्स तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नगरपालिका घनकचरा हाताळणी पद्धत या विषयावर त्यांनी संशोधन केले. श्री जगदीश प्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठ, झुनझुनू, राजस्थान यांनी त्यांच्या संशोधनाची दखल घेत पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे. या संशोधनासाठी डॉ. प्रसादू पेद्दी यांनी मार्गदर्शक, तर डॉ. बी. बी. आमले यांनी सहमार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

## नवरात्री उत्सवाचा खर्च टाळून दुष्काळग्रस्तांना मदत द्या : नानासाहेब शिंदे

**शिर्डी** : मराठवाडा, विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांमध्ये यंदा पावसाने पाठ फिरवली आहे. परिणामी खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारखी पिके डोळ्यादेखत करपून गेली आहेत. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लावावे लागत असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. शेतकरी कुटुंबांवर दुहेरी संकट कोसळले असताना नवरात्र उत्सवावर लाखो रुपयांची उधळपट्टी करणे हे सामाजिक भानाला धरून नाही, अशी मागणी भाजपा चे प्रांतिक सदस्य नानासाहेब शिंदे यांनी व्यक्त केली आहे. नवरात्र हा आदिशक्तीची उपासना करण्याचा पवित्र सण असला तरी या उपासनेचे खरे स्वरूप संकटात सापडलेल्या माणसाच्या मदतीत आहे. मंडपाची भव्यता, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, मोठ्या आवाजातील सांस्कृतिक कार्यक्रम यावर होणारा खर्च टाळून धार्मिक विधी अत्यंत साधेपणाने पार पाडावेत आणि त्यातून वाचणारा निधी दुष्काळग्रस्त भागातील कुटुंबांना धान्य, पाणी, चारा छावण्यांसाठी किंवा थेट आर्थिक मदतीच्या रूपात द्यावा, असे आवाहन त्यांनी सर्व नवरात्र मंडळांना केले आहे. शासन आणि लोकप्रतिनिधींनी देखील यात आदर्श निर्माण करावा. राजकारण बाजूला ठेवून सर्व पक्षांनी एकत्र येऊन दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. त्यांच्या या मागणीला स्थानिक पातळीवर शेतकरी आणि नागरिकांकडून पाठिंबा मिळत असून काही मंडळांनी साधेपणाने उत्सव साजरा करावा.

# संगमनेर ते कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग औद्यगिक दृष्टीने महत्वपूर्ण : ना.विखे पाटील

### महायुती सरकारकडून ९७ कोटींचा निधी उपलब्ध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : नाशिक, त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर संगमनेर - वडगाव - निळवंडे - कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग १६० ड जांभूळवाडी फाट्या पर्यतचा रस्ता जिल्ह्याच्या औद्योगिक आणि अध्यात्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरेल असा विश्वास पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. संगमनेर तालुक्यातील समनापुर येथे जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. आ. अमोल खताळ सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वरपे, उपअभियंता संजय टेकाळे यांच्यासह संगमनेर तालुका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



संगमनेर - वडगाव - निळवंडे - कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग १६०ड (जांभूळवाडी फाटा) रस्ता कामाची लांबी एकूण २० किलोमीटर असून यासाठी ९७कोटी २५ लक्ष रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. हे सुधारणा काम मे २०२७अखेर पूर्ण करण्याच्या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. मंत्री विखे पाटील म्हणाले की,अहील्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण केंद्र होत आहे.समृध्दी महामार्ग आणि शिर्डी विमानतळासाठी हा मार्ग उपयुक्त करणार आहे. शिर्डी शनिशिंगणापूर तसेच अन्य अध्यात्मिक ठिकाणांना जोडणारा मार्ग येणाऱ्या भाविकांसाठी फायद्याचा ठरणार आहे.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने येणार्या भाविकांची संख्या पाहाता रस्त्याची सुविधा दर्जेदार उपलब्ध व्हावी, तसेच वेळेत काम पूर्ण करण्याचेही त्यांनी सुचित केले.

## 'माझे गाव-माझी जबाबदारी'चा संदेश देत कोल्हार बुद्रुकमध्ये स्वच्छता अभियान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : 'माझे गाव-माझी जबाबदारी' आणि 'स्वच्छ कोल्हार-सुंदर कोल्हार' या संकल्पनेतून ग्रामपंचायत कोल्हार बुद्रुक व कोल्हार भगवतीपुर व्यापारी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २७) भव्य गाव स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ६.३० वाजता 'आम्ही कोल्हारकर' सेल्फी पॉईंटजवळून अभियानाला सुरुवात झाली. माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अजित मोरे, उपाध्यक्ष अतुल रांका, व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन संजय शिंगवी, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयाचे शिवाजीभाई शेजुळ, संचालिका स्वातीबहन, पद्मावतीबहन, ज्येष्ठ नागरिक पुरुषोत्तम हिरानंदानी यांच्यासह सुमारे १०० नागरिक, व्यापारी, युवक व महिलांनी हातात झाडू, फावडे घेत स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. स्टेट बँक परिसर, बेलापूर रोड, बी. एम. स्वीट्स परिसर तसेच एचडीएफसी बँकेसमोरील खुल्या व्यायामशाळेच्या परिसरातील कचरा संकलित करण्यात आला. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भगवती माता मंदिर व बाजारतळ परिसर स्वच्छ करण्याचा संकल्प ॲड. खर्डे पाटील यांनी व्यक्त केला. तसेच दर आठवड्याला सामूहिक स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी केला.

## हिंगणी बंधाऱ्यावर नवीन लोखंडी प्लेट बसविण्याच्या कामाचा शुभारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : कोपरगाव व निफाड तालुक्यातील गोदावरी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी आमदार विवेक कोल्हे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हिंगणी बंधाऱ्यावर नवीन लोखंडी प्लेट बसविण्याच्या कामाचा शुभारंभ रविवारी स्थानिक पदाधिकारी, नागरिक व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. कोपरगाव व निफाड तालुक्यातील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी ७ कोटी २९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून हिंगणीसह माहेगाव देशमुख, डाऊच, सडे, शिंगवे, पुणतांबा तसेच निफाड तालुक्यातील खेडलेझुंगे येथील गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांवर नवीन लोखंडी प्लेट बसविण्यात येणार आहेत. या बंधाऱ्यांच्या फळ्या जीर्ण व निकामी झाल्याने पाणीसाठवणीत अडचणी निर्माण झाल्या होत्या. परिणामी बंधाऱ्यांवर अवलंबून असलेल्या हजारो एकर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेऊन आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच जलसंपदा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. शासनाने निधी व कामांना मंजुरी दिल्याने प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. बंधाऱ्यांची दुरुस्ती झाल्यानंतर पाणीसाठा टिकून राहण्यास मदत होणार असून, शेती सिंचनासह पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि भूजल पातळी वाढण्यास त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. 'जल है तो कल है' या दृष्टिकोनातून हाती घेण्यात आलेले हे काम शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी परिसरातील नागरिक, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रयोगशील शेतीला पुरस्काराची पावती

### शंकर विखे, संदीप विखे सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : ऊस शेतीत पारंपरिक पद्धतींना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विक्रमी उत्पादन घेणाऱ्या लोणी बुद्रुक येथील शेतकरी शंकर मुरलीधर विखे आणि संदीप विश्वनाथ विखे यांच्या प्रयोगशील शेतीची दखल घेत त्यांना 'शेतीनिष्ठ पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. स्वर्गीय सारंगधर शंकर म्हस्के पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लोणी येथे आयोजित कार्यक्रमात माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या हस्ते दोघांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम व पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मागील गळीत हंगामात सुरू उसाचे विक्रमी उत्पादन घेतल्याबद्दल शंकर मुरलीधर विखे यांची, तर अडसाली उसाच्या विक्रमी उत्पादनाबद्दल संदीप विश्वनाथ विखे यांची 'शेतीनिष्ठ पुरस्कार'साठी निवड करण्यात आली. बदलत्या कृषी परिस्थितीचा विचार करून पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नियोजनबद्ध शेती





आणि सातत्याने नवे प्रयोग करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना या पुरस्कारातून मान्यता मिळाली. दरम्यान, पुरस्कारापोटी मिळालेली रोख रक्कम संदीप विश्वनाथ विखे यांनी लोणी येथील मा. श्री. सारंगधर म्हस्के पाटील वाचनालयास प्रदान केली. शेतकऱ्याच्या कर्तृत्वाला मिळालेला सन्मान सामाजिक उपक्रमासाठी देत त्यांनी सामाजिक बांधिलकीही जपली.

ऊस उत्पादनातील प्रयोगशीलता आणि विक्रमी उत्पादनामुळे परिसरातील शेतकऱ्यांसमोर आधुनिक शेतीचा नवा आदर्श निर्माण झाला आहे. पुरस्कारामुळे इतर शेतकऱ्यांनाही बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रयोगशील शेतीकडे वळण्याची प्रेरणा मिळेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास नंदू सेठ राठी, किसनराव विखे पाटील, काकासाहेब धावणे पाटील, संपतराव विखे पाटील, भागवत पाटील विखे, जिल्हा बँक अधिकारी सचिन तांबे, जिल्हा बँक व्यवस्थापक जोंधळे मॅडम, सभासद शेतकरी व लोणी ग्रामस्थ उपस्थित होते. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर शंकर विखे आणि संदीप विखे यांच्यावर विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अश्विन रुरल आयुर्वेद हॉस्पिटल तर्फे ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**आश्वि** : अश्विन रुरल आयुर्वेद हॉस्पिटल, मांची हिल, आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथे संगमनेर ज्येष्ठ नागरिक संघाच्या ९२ ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये सांधेदुखी, वात- पित्ताचे आजार,गुडघेदुखी, कंबर दुखी,कान, नाक व घसा विकार, नेत्ररोग,पंचकर्म, त्वचारोग, पोटाचे विकार तसेच इतर विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणीकरण्यात येऊन औषध उपचार करण्यात आले.कायचिकित्सा विभागात रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. राजन कुलकर्णी व डॉ. अविनाश जाधव, डॉ. ज्योती खंदारे यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांवर उपचार केले. पंचकर्म विभागात डॉ. निशांत इंगळे यांनी रुग्णावर अग्नीकर्म व विदकर्म केले स्त्रीरोग विभागात डॉ. अमोल जगताप यांनी रुग्णांची तपासणी केली, तर शल्य विभागात डॉ. शिवपाल खंडीझोड यांनी रुग्णसेवा बजावली. कान, नाक व घसा विभागात डॉ. वावरे यांनी तपासणी केली. नेत्र विभागात प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. जैनेंद्र राहुड तसेच नेत्र तंत्रज्ञ रोहित मते यांनी नेत्र तपासणी करून मार्गदर्शन केले. एक्स-रे विभागाचे कामकाज योगेश मोरे यांनी, तर पॅथॉलॉजी विभागाचे काम जयश्री गुंजाळ व हिरा खेमनर यांनी सांभाळले. याशिवाय रुग्णालयातील पदवीधर विद्यार्थी व इतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या आयोजनात आणि रुग्णसेवेत सक्रिय सहभाग नोंदविला. सदर प्रसंगी संस्थेचे संस्थापक ॲड. शाळीग्राम होडगर, उपाध्यक्ष अण्णासाहेब बलमे, प्राचार्या डॉ. श्यामल निर्मळ, तसेच संगमनेर येथील जेष्ट संघाचे अध्यक्ष सोमनाथ कळसकर गुरुजी, ज्ञानेश्वर गोंडे जी पी शेख व ज्येष्ठ संघाचे पदाधिकारी व इतर डॉक्टर उपस्थिती होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रुग्णालयाचे संचालक दत्ता शिंदे डॉ. वाघमोडे व हॉस्पिटल मधील कर्मचारी तसेच रुग्णालयातील पदवीधर डॉक्टर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची नियमित तपासणी, आजारांचे वेळेवर निदान, आयुर्वेदिक उपचार आणि निरोगी जीवनशैलीविषयी जनजागृती होण्याच्या उद्देशाने रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. राजन कुलकर्णी यांनी सर्वांना माहिती दिली. संगमनेर येथील आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी शिबिरामुळे दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळाल्याची भावना व्यक्त केली.

## वळण विविध कार्यकारी सेवा सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळण** : राहुरी तालुक्याच्या पूर्व भागातील प्रगतीपथावर असलेल्या वळण विविध कार्यकारी सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा हनुमान मंदिराच्या सभामंडपात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन उमेश खिलारे होते. यावेळी व्हाईस चेअरमन मंदाबाई राजदेव, लताबाई कारले, बाळासाहेब खुळे, राहुरी कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खुळे, महेश काळे, दादासाहेब कुलट, कारभारी खुळे, संजय आढाव, ऋषिकेश आढाव, अशोकराव कुलट, विजय आढाव, रमण खुळे, सुदामराव शेळके, धनंजय आढाव, प्रकाश आढाव, किशोर कारले, काशिनाथ खुळे, सिताराम गोसावी यांच्यासह संस्थेचे सभासद व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



चेअरमन उमेश खिलारे यांनी संस्थेचा कारभार काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, वळण संस्था राहुरी तालुक्यात अग्रगण्य स्थानावर असल्याचे सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी सभासदांनी सहकार्य करावे, तसेच घेतलेले कर्ज वेळेत फेडावे, असे आवाहन त्यांनी केले.

बाळासाहेब खुळे यांनी संस्थेच्या कामकाजाची माहिती देताना संस्थेचे एकूण २६८ सभासद असून, आतापर्यंत ११९ सभासदांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. उर्वरित ७५ सभासदांना लाभ मिळणे बाकी असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानातून दोन लाख ४३ हजार रुपये नफा झाल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या सभासदांना केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत तीन टक्के रकमेचा लाभ त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

संस्थेचे सचिव विजय शेळके यांनी सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यांना श्यामबाई पठाण व फकीचंद फंडे यांनी सहकार्य केले. नोटिशीवरील विषय क्रमांक एक ते तेरा हे सर्व विषय सभासदांनी मंजूर केले. सभेच्या उपस्थितांसाठी संस्थेच्या वतीने चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शेवटी चेअरमन उमेश खिलारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शिर्डीत मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईनगरीत रुग्णसेवेची परंपरा जपत कनकुरी रोडलगत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. कै. भाऊसाहेब सखाराम गोंदकर पाटील चॅरिटेबल ट्रस्ट आणि जगन्नाथ चंद्रभान लुटे परिवार, रुद्रा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शिबिरात जनरल मेडिसिन, शस्त्रक्रिया, अस्थिरोग, स्त्रीरोग, वंध्यत्व आणि फिजिओथेरपीसह विविध विभागांत तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. डॉ. हर्ष सुरेश, डॉ. हेमलता, डॉ. सतीश व डॉ. फणींद्र यांच्यासह तज्ज्ञांनी रुग्णांना पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन केले. गरजू रुग्णांना आवश्यक औषधे मोफत देण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष कैलासबापू कोते, उपनगराध्यक्ष अभय शेळके पाटील, दीपक भाऊ गोंदकर, रमेश गोंदकर, सचिन लुटे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कोपरगाव तालुका विद्यार्थी सहाय्यक समिती संचलित,**
**नामदेवराव परजणे पाटील लॉ कॉलेज**
**Institutional Round प्रवेश जाहिरात २०२६-२७**

**LLB (3 Yrs)**

| Quota | OPEN | | SC | | ST | | DT/VJ | | NT-B | | NT-C | | NT-D | | OBC | | SEBC | | EWS | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F |
| Maharashtra State | 5 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 0 | 3 | 2 |
| Other Than Maharashtra State | 6 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Minority | 0 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| NRI | 2 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Management | 9 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**B.A.LLB (5Yrs)**

| Quota | OPEN | | SC | | ST | | DT/VJ | | NT-B | | NT-C | | NT-D | | OBC | | SEBC | | EWS | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F | G | F |
| Maharashtra State | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 4 | 2 | 3 | 1 | 3 | 1 |
| Other Than Maharashtra State | 5 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Minority | 0 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| NRI | 2 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| Management | 0 | 0 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

संस्था पातळी व व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशासाठी कार्यालयात संपर्क साधावा,, सविस्तर माहितीसाठी kopargaon223015@gmail, com या वेबसाईट ला भेट द्यावी

**प्राचार्य**
**एन, पी, पी, लॉ कॉलेज,**
**कोपरगाव, जि.अ, नगर**

## लोणीत भव्य क्रीडा अकादमी उभारणार : ना. विखे पाटील




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळविलेले यश त्यांच्या जिद्द व मेहनतीचे प्रतीक आहे.

या खेळाडूंच्या अनुभवातून जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राचा नवा अध्याय सुरू करणार असून, लोणी येथे भव्य क्रीडा अकादमी उभारून जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणार, अशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित 'क्रीडारत्न' पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यातील एकूण ७३८ खेळाडूंचा गौरव करण्यात आला. पुरस्कारप्राप्त खेळाडूंना त्यांच्या पालकांसह सन्मानित करण्यात आले. डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, डॉ. सुस्मिता विखे पाटील, आप्पासाहेब दिघे, गणपतराव शिंदे, भारत घोगरे, पोपटराव वाणी, अशोक गागरे आदी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, खेळाडूंच्या यशात पालक व प्रशिक्षकांचे मोठे योगदान आहे. पुरस्कारप्राप्त खेळाडूंना प्रस्तावित क्रीडा अकादमीत सल्लागार म्हणून सहभागी करून त्यांच्या अनुभवातून जिल्ह्याच्या क्रीडा विकासाचे नियोजन करण्यात येईल. यावेळी फिजा सय्यद, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू शार्दुल गागरे व कोमल वाकळे यांनी मनोगत व्यक्त केले. सोहळ्यास खेळाडू, पालक व प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २७/०९/२०२६

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस व विशेषतः प्रथम वेल्थ मॅनेजमेंट सर्व्हीसेस करीता ॲथोराईज् सिग्रेटरी महेश विश्वासराव मोरे, रा. घर क्र. १४, अ विंग, मोरया हाईट, मालदाड रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय रा. माळेगाव पठार, पो. घारगांव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय जिजामाता प्राईड, घुलेवाडी फाटा, गुंजाळवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांस कळविण्यात येते की,

आमचे अशिल सौ. विमल महादेव शिरसाठ, रा. ओझर रोड, हंगेवाडी, मालुंजे ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी दि. ३१/०३/२०२५ रोजी आमचे अशिलास तुमचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी. बैंक शाखा संगमनेर या बँकेचा ००००0२ हा तुम्ही सही केलेला रक्कम रु. १,००,०००/- किंमतीचा दि. ३१/०३/२०२५ रोजीचा चेक दिला होता. परंतु तुम्ही सदरचा चेक क्र. ००००0२ हा आमचे अशिलांकडुन परत घेवुन तुम्ही आमचे अशिलांना तुमची फर्म असलेला प्रथम वेल्थ मॅनेजमेंट सर्व्हीसेस नावाने दि. ०२/०६/२०२६ रोजीचा रक्कम रु.१,००,०००/- किंमतीचा एच.डी.एफ.सी. बँक शाखा संगमनेर या बँकेचा तुमचे फर्मचे प्रथम वेल्थ मॅनेजमेंट सर्व्हीसेसच्या नावाने खाते असलेला चेक नं. ०००३३८ हा चेक तुम्ही ॲथोराईज सिक्रेटरी म्हणुन सही करुन दिला तुमचे खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे अनादरीत झालेला असल्याने सदर चेकमधील रक्कम रु. १,००,०००/- मागणी करीता तुम्हास ॲड. एस.ए. हासे, संगमनेर यांचे मार्फत तुमच्या नमुद सर्व पत्यांवर मागणी नोटीस पाठविलेली होती. परंतु वर उल्लेखीत कोणत्याही पत्यावर तुम्ही मिळुन आला नाहीत. तुमच्याशी संपर्कही होत नाही. त्यामुळे सदर जाहीर नोटीसीने तुम्हास कळविण्यात येते की, वर उल्लेखीत चेक मधील नमुद रक्कम रु. १,००,०००/- सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन कायद्याचे मुदतीत आमचे अशिलांना आणुन द्यावी अन्यता आमचे अशिल तुमच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करतील. त्याचे सर्व परिणामांची जबाबदारी तुमची राहील.

ता. २७/०९/२०२६.

**ॲडव्होकेट**
**ॲड. एस. ए. हासे**
**रा. लोहे मळा, कासारवाडी, संगमनेर - अकोले रोड,**
**इंद्रप्रस्थ लॉन्सच्या पाठीमागे,**
**ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा. ९६२३३७७८२४**

## पान १ वरुन

### पहाटेचा 'माती'चा खेळ पोलिसांनी उधळला

पहाटे सुमारे ३.३० वाजता एकापाठोपाठ येणारे चार डंपर पोलिसांनी अडविले. चालकांकडे माती उत्खनन व वाहतुकीबाबत आवश्यक परवाना अथवा पासची चौकशी केली असता, संबंधितांकडे कोणतेही वैध कागदपत्र आढळून आले नसल्याचे पोलिसांच्या कारवाईत समोर आले. प्रत्येक डंपरची अंदाजे किंमत ३५ लाख रुपये असून, प्रत्येकामध्ये सुमारे ६ ब्रास माती असल्याचे नमूद करण्यात आले आहे. चारही वाहनांतील मिळून सुमारे २४ ब्रास माती जप्त करण्यात आली.वाहनांच्या किमती व मातीची किंमत मिळून एकूण १ कोटी ४० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार रोहिदास तुकाराम खेडकर यांच्या फिर्यादीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी म्हणून संतोष अशोक अढागळे (२३, रा. टाकळी लोणार), संतोष काशिनाथ इथापे (४३, रा. लोणी व्यंकनाथ), यशवंत प्रकाश पवार (२१, रा. लोणी व्यंकनाथ) आणि मनोज शत्रुघ्नप्रसाद गुप्ता (४०, रा. शहडोल, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील कलम ३ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस उपअधीक्षक वैभव, कलूबर्मे , उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर, पोलीस हेड कॉन्स्टेबल भाऊसाहेब यमगर, पो हे. कॉ.रोहिदास खेडकर, चालक पो. कॉ. भाऊसाहेब शिंदे,यांच्या पथकाने ही कारवाई केली. महसूलला जे जमलं नाही तें बेलवंडी पोलिसांनी केल अवैध उत्खनन रोखण्याची जबाबदारी असलेल्या महसूल यंत्रणांनी केवळ तक्रारींची दखल न घेता प्रत्यक्ष कारवाई कधी करणार? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. पोलिसांच्या या कारवाईनंतर जे महसूलला जमलं नाही तें बेलवंडी पोलिसांनी कारवाई करून दाखवून दिले असे म्हणायची वेळ आली आहे. आता महसूल विभागही जागा होऊन एमआयडीसीच्या जागेतील कथित अवैध उत्खननाची सखोल चौकशी करून ठोस कारवाई करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

### भिंगारला २ एफएसआय मंजूर

आतापर्यंत केवळ १ एफएसआय लागू असल्याने वाढत्या कुटुंबांच्या गरजेनुसार बांधकाम करताना मालमत्ताधारकांना अडचणी येत होत्या. एफएसआय दुप्पट झाल्याने नियमानुसार अधिक बांधकामाची सुविधा उपलब्ध होणार असून, परिसराच्या नागरी विकासालाही चालना मिळण्याची शयता आहे. कँटोन्मेंट बोर्डाचे तत्कालीन मुख्याधिकारी मोरे व नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनीही बांधकाम नियमांत बदल करून एफएसआय वाढविण्याचा ठराव केला होता. या निर्णयामुळे भिंगारवासीयांच्या दीर्घकाळच्या मागणीला महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे.

........

चारा छावण्या सुरू करण्याबरोबरच पशुपालकांना थेट ऑनलाइन अनुदान देण्याच्या पर्यायाचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या पशुधन विमा योजनेबद्दल झरेकाठी येथील पशुपालकांनी विखे पाटील यांचे आभार मानले.

................

### दुष्काळात साधेपणाने विवाह करा.........

#### SIR च्या मुद्द्यावरूनही आरोप

डखठच्या मुद्द्यावरून विरोधक राजकारण करीत असल्याचा आरोप विखे पाटील यांनी केला. डखठ असो किंवा अन्य कोणताही विषय, त्याच्या माध्यमातून राजकीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या विषयांकडे राजकीय दृष्टिकोनातून न पाहता त्यामागील वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पिकांच्या नुकसानीचे अहवाल मागविले दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मदतीबाबत निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे विखे पाटील यांनी यापूर्वी स्पष्ट केले आहे. पावसाअभावी सोयाबीनसह विविध पिकांचे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर नुकसानीचे अहवाल मागविण्यात येत आहेत. या अहवालांच्या आधारे पुढील उपाययोजनांबाबत मंत्रिमंडळात चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. संकटाच्या काळात अनावश्यक खर्च टाळून उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करत परिस्थितीला सामोरे जाणे गरजेचे आहे, असा संदेश त्यांनी दिला.

### पुढचा मान्सूनही धोयात!

राहिल्यास राज्याच्या जलनियोजनाची कसोटी लागणार आहे.दरम्यान, छत्तीसगडमधील मुसळधार पावसाचा फटका गडचिरोली जिल्ह्याला बसला असून अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाशी सातत्याने संपर्कात असल्याचे सांगितले. ज्या ठिकाणी नागरिक अडकले होते, तेथे रेस्यू टीम पाठवून नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. दुपारपर्यंत पुराचे पाणी ओसरण्याची शयता असून परिस्थिती नियंत्रणात येईल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

# सार्वजनिक शौचालयातील दुर्गंधीमुळे दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** येथील राम मंदिर परिसरात सार्वजनिक शौचालयातून बाहेर पडलेल्या रासायनिक वायूमुळे २ जणांचा गुदमरून मृत्यू झाला. मृणालताई ब्रिजजवळ, पारसी पंचायत गेटसमोर असलेल्या सार्वजनिक शौचालयात ही घटना घडली. या घटनेनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली असून, नेमक्या कोणत्या रसायनामुळे हा प्रकार घडला, याचा तपास सुरू आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, सार्वजनिक शौचालयातून अचानक तीव्र आणि घाणेरडा रासायनिक वास येत असल्याचे जाणवले. या वासामुळे शौचालयाच्या परिसरात गेलेल्या दोन जणांना गुदमरल्यासारखा त्रास होऊ लागला. प्राथमिक माहितीनुसार, रासायनिक वासाचा परिणाम झाल्याने दोघांची प्रकृती बिघडली.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. इचउ अग्निशमन दल, पोलीस, १०८ रुग्णवाहिका तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि पालिका कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. परिसर सुरक्षित करण्यासाठी तसेच संभाव्य रासायनिक धोका तपासण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात आली. दोन्ही तरुणांना तातडीने उपचारासाठी ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी पहाटे ३.४९ वाजता दोघांनाही मृत घोषित केले. मृतांची नावे प्रभाकर धनिवार (२४) आणि भाविन देसाई (१८) अशी आहेत.




# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर भीषण अपघात; तिघे जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकजवळ रविवारी भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने खोपोली नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर द्रुतगती मार्गावरील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. मिसिंग लिंक परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. त्यामुळे मुंबई-पुणे मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अपघाताची माहिती मिळताच मदतकार्य सुरू करण्यात आले. महामार्ग पोलीस तसेच वाहतूक नियंत्रक विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून, अपघातग्रस्त वाहने बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वाहतूक कोंडीमुळे वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्याने प्रवासाचा वेळ वाढला आहे. महामार्गावरील परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी यंत्रणांकडून प्रयत्न सुरू आहेत. वाहनचालकांनी शक्य असल्यास पर्यायी मार्गाचा वापर करावा तसेच वाहतूक कोंडीत संयम राखावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# नितीन दिनकर यांच्या हस्ते वर्षा बंगल्यावर गणरायाची आरती



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यासाठी अभिमानाचा आणि गौरवाचा क्षण म्हणजे नेवासा तालुक्याचे भूमिपुत्र आणि भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांना थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थान 'वर्षा' बंगल्यावर गणरायाची आरती करण्याचा बहुमान मिळाला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचे केंद्र असलेल्या वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या मंगलमय आरतीत नितीन दिनकर यांचा सहभाग हा केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून,संपूर्ण नेवासा तालुक्याच्या मातीचा सन्मान आहे. ही आनंदाची वार्ता नेवासा तालुक्यात वाऱ्यासारखी पसरताच नितीन दिनकर यांच्या बालपणाचे मित्रपरिवार, कार्यकर्ते आणि हितचिंतकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी, समाजासाठी झटणाऱ्या, तळागाळातील कार्यकर्त्याला सोबत घेऊन जाणाऱ्या नितीन दिनकर यांच्या निस्वार्थ कार्याची हीच तर पावती आहे.

# सलग तीन दिवस बँका बंद

## ग्राहकांवर सेवांचा परिणाम होण्याची शक्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** बँक कर्मचारी संघटनांनी २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांच्या देशव्यापी संपाची हाक दिल्याने बँकिंग सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. सलग पाच दिवस बँका बंद राहू नयेत आणि ग्राहकांची गैरसोय कमी व्हावी, यासाठी रविवारी बँकांचे कामकाज सुरू ठेवण्यात आले. सप्टेंबरमधील चौथा शनिवार असल्याने शनिवारी बँका बंद होत्या. त्यानंतर आता सोमवारपासून बुधवारपर्यंत तीन दिवस संपामुळे बँकांच्या शाखांचे कामकाज प्रभावित होण्याची शक्यता आहे.

संपाचा परिणाम प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील बँका, जुन्या खासगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांवर होऊ शकतो. त्यामुळे चेक क्लिअरन्स, बँक खात्यातून रोख रक्कम काढणे किंवा जमा करणे यासह शाखांमधून दिल्या जाणाऱ्या विविध सेवांमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, बँकांच्या शाखांचे कामकाज प्रभावित झाले तरी इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, यूपीआय आणि अन्य डिजिटल सेवा सुरू राहणार आहेत. आयसीआयसीआय, एचडीएफसी आणि ॲक्सिससारख्या खासगी बँकांच्या शाखांवर या संपाचा परिणाम होणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. बँक कर्मचाऱ्यांनी यापूर्वी ११ सप्टेंबरलाही देशव्यापी संप केला होता. सार्वजनिक क्षेत्रातील बहुतांश बँकांनी ग्राहकांना संपाच्या काळात पर्यायी सेवांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. भारतीय स्टेट बँकेनेही शाखा व कार्यालयांमध्ये आवश्यक सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल; मात्र काही सेवा प्रभावित होऊ शकतात, असे स्पष्ट केले आहे. रोख रक्कम काढण्यासाठी एटीएम, पैसे जमा करण्यासाठी रोख ठेव यंत्र, तसेच इंटरनेट व मोबाइल बँकिंग, यूपीआय आणि अन्य डिजिटल सेवांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भरधाव पेट्रोल टँकरने महिलेला चिरडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अंधेरी पूर्व येथील मरोळ नाका परिसरात भरधाव पेट्रोल टँकरने महिलेला चिरडल्याने ३२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. कामावरून सुटल्यानंतर घरी जात असताना ही दुर्घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी टँकरचालकाला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला काम आटोपून घरी जाण्यासाठी निघाली होती. मरोळ नाका परिसरातून जात असताना भरधाव पेट्रोल टँकरने तिला जोरदार धडक दिली. त्यानंतर ती टँकरच्या चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झाली. अपघातानंतर तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत टँकरचालकाला ताब्यात घेतले. अपघाताच्या वेळी चालक मद्यधुंद अवस्थेत होता का, याची तपासणी करण्यासाठी पोलिसांनी त्याच्या रक्ताचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

दरम्यान, मुंबईतील रस्ते अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मरोळ नाका येथील या दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

# नशामुक्ती आणि परंपरेचा संदेश : शिर्डीत गणेशोत्सव मिरवणूकीची धूम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** क्रांती युवक मंडळाच्या गणेशोत्सवाची पारंपरिक विसर्जन मिरवणूक यंदाही मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि ढोल-ताशांच्या गजरात संपन्न झाली. गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण शिर्डी नगरी दुमदुमून गेली . क्रांती मंडळाने घेतलेला 'नो डीजे, नो डॉल्बी'चा महत्वपूर्ण निर्णय आणि त्याचबरोबर सुरू केलेले नशामुक्ती अभियान या दोन्ही उपक्रमांना शिर्डीकर नागरिकांनी उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद दिला.

विसर्जन मिरवणुकीच्या प्रारंभी मंडळाच्या वतीने उपस्थित असलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचा आणि मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी भाऊसाहेब चौधरी, शिर्डीचे माजी नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर, शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी सागर काळे, साईबाबा संस्थानचे मंदिर सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी, प्रसिद्ध व्याख्याते डॉ. ओंकार जोशी, बाळासाहेब गोंदकर, दिगंबर कोते, विश्व हिंदू परिषदेचे सुरेंद्र महाले, क्रांती युवक मंडळाचे अध्यक्ष आकाश वाडेकर, पारस जैन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिर्डी पोलीस स्टेशनचे सागर काळे, माजी नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर यांनी क्रांती मंडळाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष आकाश वाडेकर, उपाध्यक्ष बबलू वरपे, किरण परदेशी, खजिनदार ललित शेळके, संतोष तांबे, महेश वैद्य, अतिक पठाण, संदेश रत्नपारखी, रितेश भालेराव, अरुण हजारे, योगेश मोटवाणी, आदित्य वारुळे, योगेश राऊत, मोहन क्षत्रिय, आदित्य मयूर, आर्यन तेजी, पारितोष पटेल, मयूर बोरहाडे, सिद्धांत नागपाल, प्रतीक वाघचौरे, अनंत लासूरे, शुभम बनकर, हृषी वरपे, सूरज कोते, वेदांत कोते, यश कोतकर यांच्यासह मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

**क्रांतीचा नवा अध्याय**

गणेशोत्सवासारखे सण समाजप्रबोधनाचे आणि एकत्र येण्याचे माध्यम बनले पाहिजेत, या उद्देशानेच आमच्या 'क्रांती युवक मंडळाने' यंदा डीजे आणि डॉल्बीमुक्त संस्कृतीचा तसेच नशामुक्तीचा संकल्प सोडला होता. मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून आणि शिर्डीकरांच्या भक्तीमय सहकार्यातूनच हा आदर्श पॅटर्न उभा राहिला आहे. भविष्यातही अशाच प्रकारची सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम शिर्डीत सातत्याने राबवले जातील.''

**- सचिन तांबे**
**(प्रमुख, क्रांती युवक संघटना तथा माजी विश्वस्त, साईबाबा संस्थान)**

## निधन

### गणेश रोठे



**नेवासा :** तालुक्याती लबेलपिंपळगाव(कारवाडी)येथील शेतकरी गणेश पोपट रोठे यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सूना,नातवंडे असा परिवार आहे.भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष राहुल रोठे व सामाजिक कार्यकर्ते अमोल रोठे यांचे वडील होते.

### सुभाष सोलंकी



**श्रीरामपूर :** येथील रेल्वे स्टेशन समोरील आझाद हिंद हॉटेलचे मालक सुभाष बाबुलाल सोलंकी (वय -७५) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.ते नंदकिशोर सोलंकी यांचे थोरले बंधू तर ललीत सोलंकी यांचे वडील होत.

# शिर्डीत ७४ व्या सुवर्ण कलशारोहण स्मृतिदिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम

**शिर्डी :** शिर्डी ग्रामस्थ, शिर्डी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी व श्री पारनेरकर गुरु सेवा मंडळ यांच्या वतीने ७४ व्या सुवर्ण कलशारोहण स्मृतिदिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले ची माहिती साईभक्त विनायक रत्नपारखी यांनी दिली.

या कार्यक्रमात सुवर्ण कलशाचे व डॉ. पारनेरकर महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री पारनेरकर गुरु सेवा मंडळचे कार्याधिकारी डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर हे राहणार आहेत.

# साखर कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी ५ ऑक्टोबरला कोल्हापुरात विराट मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** साखर कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे व सरचिटणीस राऊ शंकर पाटील यांच्या नेअतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगरचे राज्य सरचिटणीस डी. एम. निमसे यांनी दिली. जिल्हा साखर कामगार समन्वय समितीच्या रविवारी झालेल्या बैठकीत मोर्चाबाबत निर्णय घेण्यात आला. राज्यातील साखर कामगारांचे सुमारे एक ते दीड हजार कोटी रुपयांचे थकीत वेतन मिळावे, कंत्राटी कामगारांना कारखान्याच्या सेवेत सामावून घेऊन वेतनश्रेणी लागू करावी, तसेच साखर कारखान्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करावी, अशा मागण्या करण्यात येणार आहेत. २२ जुलै २०२६ रोजी रद्द करण्यात आलेला बीआयआर कायदा पूर्ववत लागू करावा, ही प्रमुख मागणीही मोर्चाद्वारे करण्यात येणार आहे. बैठकीस अविनाश आपटे, ज्ञानदेव पाटील आहेर, अशोकराव पवार यांच्यासह विविध साखर कारखान्यांचे कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. मोर्चात राज्यातील साखर कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

# पुरणगावातील नारायणपूर फिडरवर वीज चोरीचा आरोप, चौकशीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** तालुक्यातील पुरणगाव परिसरातील नारायणपूर फिडरवर अवैधरीत्या आकडे टाकून वीज चोरी होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. याबाबत २५ सप्टेंबर रोजी वैजापूर येथील महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून, दक्षता पथकाच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, नारायणपूर फिडरवरील काही ठिकाणी अनधिकृतरीत्या आकडे टाकून वीज वापरली जात आहे. त्यामुळे संबंधित रोहित्रावर अतिरिक्त विद्युत भार पडत असून, रोहित्र नादुरुस्त होण्यासह परिसरातील अधिकृत ग्राहकांचा वीजपुरवठा प्रभावित होण्याची शक्यता आहे. वीज चोरीमुळे महावितरणच्या वितरण व्यवस्थेवरही अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचे शेतकऱ्यांनी म्हटले आहे. नारायणपूर फिडरची प्रत्यक्ष पाहणी करून अनधिकृत वीज जोडण्यांची तपासणी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच आवश्यकतेनुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रार अर्जावर बाळासाहेब सयाजी कसबे, अरुण सुधाकर कसबे आणि सर्जेराव निवृत्ती कसबे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**छोटी जाहिरात**

श्रीरामपूर शहरालगत MIDC पासून जवळच धनगरवाडी शिवारात ११ गुंठे शेतजमीन विकणे आहे.
संपर्क : रमेश सातव
८१०४९६२३८९

# पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. सचिन सकट यांना मुख्य वक्तेपद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला येथील सुपुत्र तथा औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रातील संशोधक डॉ. सचिन श्रीधर सकट यांना फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेसाठी मुख्य वक्ते म्हणून विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. ५ व ६ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या 'औषधनिर्माणशास्त्र व कृत्रिम बुद्धिमत्ता अनुप्रयोगांवरील आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत' ते मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. सकट हे पुणे येथील श्रीबायोस इनोव्हेशन्स प्रा. लि.चे संस्थापक संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. औषध संशोधन, औषधांच्या मानवी वापरापूर्वीच्या परिणामांचा व विषारी परिणामांचा अभ्यास तसेच नवीन औषधांचा शोध या क्षेत्रात त्यांना १५ वर्षांहून अधिक काळाचा अनुभव आहे. मुंबईतील रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतून त्यांनी औषधशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त केली आहे.

त्यांच्या नावावर ३४ हून अधिक संशोधन लेख, चार शैक्षणिक पुस्तके आणि दोन भारतीय डिझाईन पेटंट आहेत. त्यांच्या संशोधनाचा विविध संशोधकांनी १ हजार ६०० हून अधिक वेळा संदर्भ घेतला आहे. २०१० मध्ये जर्मनीतील बर्लिन येथेही त्यांनी संशोधन सादर केले होते. पॅरिस परिषदेत 'नवीन औषधांच्या शोधात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर' या विषयावर ते व्याख्यान देणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे औषध संशोधनातील वेग, अचूकता आणि परिणामकारकता वाढविण्याच्या शक्यतांवर ते प्रकाश टाकणार आहेत.ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल करणाऱ्या डॉ. सकट यांच्या या यशाबद्दल नेवासा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

**चेंज इन नेम**

माझे जुने नाव - SHAIKH PARVEZ ALTAF बदलून आता नवीन नाव - SHAIKH PARVEJ ALTAF असे करण्यात आले आहे वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहेत.आधार नंबर २५४१०६१६२८८५

## जाहिर नोटीस

जा क्र./५०९/२०२६
नि.नं. ३६
ॲड. टी. बी. ढोकणे
नेमलेली ता. ०६-११-२०२६

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, सि.डी. यांचे कोर्टात
रे.द.नं.-५६/२०२५

धनको
पृथ्वीराज दत्तात्रय साबळे
ऋणको
शोभाबाई शेषराव साबळे वगैरे
नोटीस सि.पी.सी. ऑर्डर २१ रुल, २२ प्रमाणे :-

प्रति,
३) रमेश बाजीराव पहिलवान,
४) सुरेश बाजीराव पहिलवान,
५) मिना मधुकर खर्चने
६) कविता अनिल घोडगे
७) छबुबाई बाजीराव पहिलवान,
सर्व रा. मजले शहर, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर
ह.मु. मुंबई ता.जि. मुंबई, मो.नं ९७६८२०७२७३/८८७९८३१८७८

ज्याअर्थी वर नामनिर्दिष्ट केल्याप्रमाणे धनको पृथ्वीराज दत्तात्रय साबळे यांनी रे.मु.नं. ७१८/२०१९ चे हुकुमनाम्यानुसार अंमल बजावणीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. याद्वारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख ०६-११-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात तुम्ही सदर अर्जास कारण दाखविण्यासाठी तुम्ही स्वतः जातीने अथवा आपण नियुक्त केलेल्या वकिलांमार्फत हजर होवुन सदर अर्जासंबंधीत कागदपत्र व दस्तऐवजासह हजर राहावे तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करुन निर्णय देण्यात येईल,

आज दि.२४/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**तयार करणार**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**हुकुमावरुन**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
**सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १२६ ४६९ ९०० | ५ | २३० २५८ ७८० | १ | १४६ ३४४ ४७० |

७९-९३-४५-५७-८१-१२

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २४० २६८ ३३० | ८ | १२५ २६० ४४० | ४ | १४९ २३९ ५९० |

१६-६४-२८-८०-८०-५४-४७

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३४० ३९० २०० | ० | १९० २८० २४४ | ३ | १२० ३४६ ३३७ |

६२-२१-७०-०८-५३-३९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

## द•ख•ल



### ज्येष्ठ मार्गदर्शक बाबासाहेब कवाद यांचे कार्य समाजाभिमुख : गीतांजली शेळके

**निघोज :** ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष वै. बाबासाहेब कवाद यांनी दुरदृष्टी ठेऊन पतसंस्था, फलोद्यान संस्था,मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट व न्यू इंग्लिश स्कूल या संस्थेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने जनविकास केला असल्याचे प्रतिपादन जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांनी व्यक्त केले आहे. निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांच्या आठव्या पुण्यस्मरण कार्यक्रम निमित्ताने त्यांना मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट व बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात त्यांना अभिवादन करीत आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शेळके बोलत होत्या. यावेळी भास्करराव कवाद, प्रियंका शेळके, डॉ. भास्करराव शिरोळे, वसंत कवाद, अमृता रसाळ, नामदेवराव थोरात, चंद्रकांत लामखडे, रामदास वरखडे, बाबासाहेब कवाद, शांताराम कळसकर, प्रकाश कवाद, राजाराम कवाद, ठकाराम लंके तसेच विविध संस्थाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### किंग ग्रुप चिचोंडी मित्र मंडळाने इतिहास घडवला



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथील किंग ग्रुप मित्र मंडळाने दहा दिवसापासून सुरू असलेल्या श्रद्धा आणिभक्तीच्या आनंद उत्साहाची शुक्रवारी दिनांक २५ सप्टेंबर रोजी मोठ्या भक्तीवर वातावरणात सांगता झाली यंदा लाडक्या बाप्पाला निरोप देताना काढलेल्या विसर्जन मिरवणुकीतआवाज उठवलेल्या डीजे बंदी ला चांगले यश मिळाल्याचे पहावयास मिळाले किंग ग्रुप तरुण मंडळाने कर्कश आवाजालाफाटा देत पारंपारिक वाद्य ढोल पथक वाद्याच्या गजरात बाप्पाला निरोप देत किंग ग्रुप तरुण मंडळाने नवा इतिहास घडवला. या मंडळाने ढोल ताशा पथक मिरवणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या मिरवणुकीत डीजे मुक्त मिरवणुकीने सर्वांची मने जिंकले मिरवणूक उत्साहपूर्ण भक्तिमय आणि शांतता माय वातावरणात पार पडली यावेळी चिचोंडी परिसरातील नागरिक ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. डीजेच्या दणदणावर यिरकणाऱ्यातरुणाईला आता पारंपारिक वाद्याची चांगलीच गोडी लागली आहे ग्रामीण भागात आता गणेश मंडळांना ढोल ताशा पथक खुणावत आहेत मधल्या काळातडोबी आणि डीजेचे वेडपसरल्याने तरुणाई झिंगाट व्हायची परंतु प्रशासनाने त्यावर बंदी घातली आता यापुढे बाप्पाचे आगमन आणि विसर्जनाच्या वेळी पारंपारिक वाद्याचाच आवाज घुमणार.

### राष्ट्रीय सेवा योजना ही एकात्मतेतून समूहाकडे नेणारी : प्रा. कोल्हे



**एरंडगाव :** बिनभिंतीची शाळा म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना होय. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता जागृत होते. एकात्मतेतून समूहाकडे नेणारी, अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी आणि श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणारी योजना म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना, असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त माजी उपप्राचार्य प्रा. आर. जी. कोल्हे यांनी केले.जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,अहिल्यानगर येथील मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २४ सप्टेंबर २०२६ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना दिना'चे औचित्य साधून विशेष व्याख्यान व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. के. आर. पिसाळ यांच्या प्रास्ताविकाने झाली, तर कला शाखाप्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी एन.एस.एस. महिला प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. लबडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. पी. ए. फटांगरे, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. व्ही. एम. वाळुंजकर, प्रा. के. एस. कराड, प्रा. पी. एन. खरड, प्रा. एस. आर. कावत, प्रा. एस. ए. घालमे, प्रा. एस. एस. साळवे आणि प्रा. स्नेहा निमसे उपस्थित होते.तसेच प्रा. एस. एस. शिंदे, अल्तमश शेख, विनायक शेळके, ऋतिक ताकपेरे व शामा वाळके यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी वृक्षारोपणासाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत भारदे स्कूलच्या मुलींचे वर्चस्व



**अमरापुर :** जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूलच्या मुलींनी उल्लेखनीय कामगिरी केली. १४ व १७ वर्षांखालील मुलींच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. १४ वर्षांखालील मुलींच्या विजयी संघात कर्णधार श्रावणी शिरसाठ, स्वरा नाईकवाडी, काव्य राठोड, आराध्या राठोड, स्वामिनी साखरे, कल्याणी बुलबुले, धनश्री रणमले, स्वरा ढाकणे, आरोही ढाकणे, सौम्या दौंड, गौरी खेडकर, भक्ती खांबट, आरुषी नाईक, स्वरा घुगे आणि अक्षरा काळे यांचा समावेश आहे. १७ वर्षांखालील मुलींच्या विजयी संघात कर्णधार ईश्वरी कौटुंबे, रुनाली प्रजापती, वैष्णवी मार्कड, कार्तिकी नगरकर, गौरी खांबट, श्रद्धा राऊत, ज्ञानदा भाडाईत, सानिका डाके, तृप्ती व्यवहारे आणि शिवानी शेळके यांचा समावेश आहे.

# शेवगांवात लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

## मानाच्या सहा गणपतींचा सहभाग; रात्री बारापर्यंत विसर्जन, डीजेमुक्त उत्सव यशस्वी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात दहा-बारा दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची शुक्रवारी (दि. २५) उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. शहरातील मुख्य विसर्जन मिरवणुकीत मानाच्या सहा गणपतींचा सहभाग राहिला. ढोल-ताशांचा निनाद, गणेशभक्तांचा उत्साह आणि मंडळांनी सादर केलेल्या विविध देखाव्यांमुळे शहरातील वातावरण अक्षरशः गणेशमय झाले होते.

शहराची धार्मिक परंपरा जपणाऱ्या पेशवेकालीन जाधव वाड्यातील मानाच्या गणपतीची आरती नायब तहसीलदार संजय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, नगरसेवक आशुतोष डहाळे, डॉ. नीरज लांडे, रोहित काथवटे, बंडू रासने, दत्तात्रय फुंदे, सम्राट कोपरगे, दीपक आहुजा, गोविंद जाधव तसेच लाटे गणपती मंडळाचे अध्यक्ष महेश लाटे, आनंद लाटे, अंचल लाटे यांच्यासह गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरतीनंतर मानाच्या गणपतींची विसर्जन मिरवणूक मार्गस्थ झाली. भोईराज तरुण मंडळ, शिवशक्ती युवक मंडळ, शहीद भगतसिंग मित्र मंडळ, बालाजी तरुण मंडळ (वडार समाज), टिळक मित्र मंडळ आदी मानाचे गणपती मिरवणुकीत सहभागी झाले. विविध मंडळांच्या गणेशभक्तांनी मिरवणुकीत कलाविष्कार सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

यंदा शेवगाव शहर व तालुक्यात तब्बल २६० सार्वजनिक गणपतींची स्थापना करण्यात आली होती. त्यापैकी ३४ गावांनी 'एक गाव, एक गणपती'चा आदर्श पुढे ठेवला. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून गणेशोत्सवात सामाजिक सलोखा आणि जनजागृतीचा संदेश देण्यात आला.शिवसेनेचे नेते अरुण मुंढे यांनी मुख्य विसर्जन मिरवणुकीतील मानाचे गणपतीचे अध्यक्ष यांचा फेटा बांधून सत्कार केले यावेळी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते

पावसाने ओढ दिल्याने तालुक्यावर दुष्काळाचे सावट असतानाही गणेशभक्तीचा उत्साह कायम राहिला. मात्र, काही मंडळांनी नवव्या, दहाव्या व अकराव्या दिवशी गणरायाला निरोप दिला.

### कृत्रिम तलावांत घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन

पर्यावरणपूरक विसर्जनाला चालना देण्यासाठी नगरपरिषदेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शहीद भगतसिंग चौक, कोर्ट परिसर आणि खंडोबा नगर येथे कृत्रिम तलाव तयार केले होते. या ठिकाणी अनेक घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मोठ्या गणेशमूर्तींचे जोरापूर येथे विसर्जन करण्यात आले. या ठिकाणी नगरपरिषद कर्मचारी व पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता.



### पोलिसांचे काटेकोर नियोजन

गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासूनच शेवगाव पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले होते. शहरातील प्रमुख चौक, धार्मिक स्थळे तसेच पोलिसांचे फिरते पथकाची विशेष नजर होती. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकाची नियुक्ती करण्यात आली होत. डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी पोलिसांनी केलेल्या आवाहनाला मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाला आळा घालत उत्सव शांततेत पार पडला.

# नेवाशात ९ हजार ३३ दिव्यांच्या प्रकाशात अवघ्या ९० सेकंदांत रंगणार 'ज्ञानेश्वरी' पारायण सोहळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** जगद्गुरू श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेल्या आणि जगाला 'ज्ञानेश्वरी' सारखा अलौकिक ग्रंथ लाभलेल्या श्री क्षेत्र नेवासा येथे येत्या २ ऑक्टोबर रोजी (भाद्रपद वद्य कपिला षष्ठी, शुक्रवार) 'ज्ञानेश्वरी जयंती' उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ९ हजार ३३ दिव्यांच्या भव्य दीपोत्सवात अवघ्या ९० सेकंदांत संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण पूर्ण केले जाणार आहे. या अभूतपूर्व सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र ज्ञानेश्वर संस्थान नेवासा येथे नुकतीच एक महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली असून सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे.



संस्थानच्या नियोजन बैठकीस ह.भ.प. वैराग्यमूर्ती देविदासजी महाराज म्हस्के, संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ह.भ.प. रामेश्वर महाराज कंठाळे, ह.भ.प. गंगाधर महाराज गाडेकर यांच्यासह संस्थानचे सर्व विश्वस्त मंडळ, शिंगवे दत्ताचे येथील गुरुदत्त तरुण मंडळाचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळा निर्विघ्न आणि शिस्तबद्ध रीतीने पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आणि गावोगावीतून पायी दिंड्यांसह हजारो भाविक नेवासा नगरीत दाखल होणार आहेत.

ज्ञानेश्वरी ग्रंथातील एकूण ९ हजार ३३ ओव्यांना अनुसरून ९३३ वाचक एकत्र बसून हे पारायण करणार आहेत. यामध्ये प्रत्येक भाविकाला १० ओव्या वाचनासाठी दिल्या जाणार असून, अवघ्या ९० सेकंदांमध्ये संपूर्ण ज्ञानेश्वरी पारायण पूर्ण होण्याचा हा अद्भूत सोहळा पार पडेल. तसेच, एका ओवीस एक याप्रमाणे तब्बल ९ हजार ३३ निरंजन प्रज्वलित करून भव्य दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

शुक्रवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता मंदिरात भाविकांचे आगमन होईल. दुपारी ३ ते ४ या वेळेत ज्ञानेश्वरी वाचकांचे मनोगत पार पडल्यानंतर ४ ते ५:३० या वेळेत नेवासा शहरातून ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य व नयनरम्य मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता ९,०३३ दिव्यांच्या दिव्य प्रकाशात ९० सेकंदांचे ऐतिहासिक पारायण व दीपोत्सव संपन्न होईल.

सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी प्रवरासंगम येथील दानशूर बेल्हेकर परिवार व त्यांच्या आप्तेष्टांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या संपूर्ण महाप्रसादाचे नियोजन व व्यवस्थापन श्री क्षेत्र शिंगवे दत्ताचे येथील गुरुदत्त तरुण मंडळ व ग्रामस्थ सांभाळणार आहेत. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सर्व भाविकांनी येताना स्वतः सोबत 'ज्ञानेश्वरी ग्रंथ' आणि दीपोत्सवासाठी 'निरंजन' सोबत आणावे आणि या ऐतिहासिक सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री क्षेत्र ज्ञानेश्वर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीर वडार एकता फाउंडेशनचे राज्यातील पहिले जिल्हा जनसंपर्क कार्यालय नगरमध्ये



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** वीर वडार एकता फाउंडेशनचे महाराष्ट्रातील पहिले जिल्हा जनसंपर्क कार्यालय अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात सुरू करण्यात आले. या जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयदादा गोरे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी मारूती विटेकर यांची अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली.

या सोहळ्याला अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक नितीन शेलार, सागर कुसमुडे, अनिलजी बोठे, राजेंद्र ननवरे, नितीन कुसळकर, कैलास येटेकर, राजू धोत्रे, राजेश शिंदे, गोपाळ समाजाचे अध्यक्ष संदिप गिरे, बोरडगावचे सरपंच श्रीराज शेख, शिवाजी पंजरकर, अनिल विटेकर, ओंकार विटेकर, राजू विटेकर, ऋषिकेश हरल यांच्यासह हजारो वडार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, जनसंपर्क कार्यालयामुळे वडार समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठी मदत होणार आहे. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष मारूती विटेकर यांनी यावेळी बोलताना समाजाच्या हक्कासाठी आणि वीर वडार एकता फाउंडेशनचे कार्य तळागाळातील बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असणार असल्याचे स्पष्ट केले.

# दुष्काळाची झळ; हॉटेल व्यवसायावरही परिणाम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** गेल्या तीन-चार महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने करंजी परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून फळबागा वाचविण्यासाठी विकतचे पाणी घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. तर पाण्याअभावी उभी पिके वाळून चालल्याचे चित्र परिसरात दिसत आहे.

पावसाने पाठ फिरवल्याने विहिरी, बोअरवेल आणि अन्य जलस्रोतांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. उपलब्ध पाण्याचा वापर प्रामुख्याने फळबागा वाचविण्यासाठी केला जात असून त्यासाठी शेतकऱ्यांना टँकर अथवा अन्य माध्यमातून विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढत असून आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवरील संकट अधिकच गडद झाले आहे.



दुष्काळामुळे लोकांच्या हातातील पैसा कमी झाला असून हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. अनेक मालाच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे खर्च वाढत असताना व्यवसाय निम्म्यावर आल्याने दुष्काळाची झळ हॉटेल व्यवसायीकांनाही बसत आहे. **तौफिक शेख**

दुष्काळाची झळ आता केवळ शेतीपुरती मर्यादित न राहता गावातील व्यवसायांनाही बसू लागली आहे. करंजी परिसरातील प्रमुख व्यवसायांपैकी एक असलेल्या हॉटेल व्यवसायावरही त्याचा परिणाम जाणवत आहे. ग्राहकांची संख्या कमी झाल्याने अनेक हॉटेल व्यावसायिकांचा व्यवसाय निम्म्यावर आल्याचे सांगितले जात आहे.

एकीकडे अन्नधान्य, भाजीपाला, दूध, गॅस तसेच अन्य साहित्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. मात्र ग्राहकांची संख्या कमी झाल्याने हॉटेल व्यावसायिकांना वाढलेला खर्च आणि घटलेले उत्पन्न यांचा ताळमेळ घालणे कठीण होत आहे. शेतकऱ्यांसोबतच त्यावर अवलंबून असलेल्या छोट्या-मोठ्या व्यवसायांवरही दुष्काळाचे सावट गडद होताना दिसत आहे.

# १३ गावांतील तलाव, बंधारे व पाणलोट क्षेत्र वर्षातून चार वेळा भरावेत : मागणी

## ताजनापूर लिफ्ट कृती समितीची बैठक संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. १ मधून वरूर-आखेगावसह १३ गावांतील तलाव, बंधारे व पाणलोट क्षेत्र वर्षातून एकदा नव्हे, तर चार वेळा भरून देण्यात यावे. सद्यस्थितीत शासनाने सदरील बंधारे व तलाव एकदा भरून देण्याचे नियोजन केले आहे. मात्र, असे करणे म्हणजे केवळ बंधारे व तलावांमध्ये पाणी शिंपडल्यासारखे करण्याचे धोरण ठरेल. असा प्रस्ताव शेतकरी कदापि खपवून घेणार नाहीत, असे प्रतिपादन ताजनापूर सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष तथा जलतज्ञ ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केले.

आखेगाव येथे ताजनापूर सर्वपक्षीय कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे रूपांतर सभेत झाले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब काटे होते. यावेळी गंगाशेठ पायघन, माणिक म्हस्के, जगन्नाथ गावडे, लहानू जवरे, नवनाथ ढाकणे, भाऊसाहेब सातपुते, श्रीरंग हुलजुते, आदिनाथ झिरपे, आदिनाथ धावणे, रंगनाथ ढाकणे, रामजी ढाकणे, अंशीराम बोडखे, भाऊसाहेब बोडखे, शिवराम गिरमकर, सकाहारी भापकर, गणेश धावणे, निवृत्ती चव्हाण, त्रिंबकराव



काटे, ॲड. संजय काकडे, संतोष काकडे, विठ्ठल केदार, बबन मोरे, रमेश चितळे, श्रीकांत भुजबळ, सुनील गोर्डे, महादेव जवरे, अर्जुन ढाकणे, विनायक काटे, तबाजी बोडखे, आबासाहेब डोंगरे, सोमनाथ काटे, योगेश झिरपे, एकनाथ झिरपे, अमित कोरडे, विठ्ठल झिरपे यांच्यासह १३ गावांतील युवक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगन्नाथ गावडे म्हणाले की, आपल्या हक्काचे पाणी आपल्या गावांना मिळेपर्यंत हे पाणी इतर तालुक्यांना देण्याचा आग्रह सत्ताधाऱ्यांनी करू नये. अगोदर शेवगाव तालुक्यातील गावांना पाणी द्यावे आणि त्यानंतर इतर ठिकाणी पाणी द्यायचे की नाही, याबाबत निर्णय घ्यावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच बैठकीचे आयोजन कृती समितीचे निमंत्रक लक्ष्मण गवळी यांनी केले, तर आभार भाऊसाहेब सातपुते यांनी मानले.

# खाद्यपदार्थ स्टॉलवर अन्न व औषध प्रशासनाची धाड

## अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी केली खाद्यपदार्थ व स्वच्छतेची तपासणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोफेसर कॉलनी चौकातील विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलची स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता तसेच किचनमधील स्वच्छतेची पाहणी करून खाद्यपदार्थ व्यवसायिकांना आवश्यक सूचना दिल्या. खाद्यपदार्थ दर्जेदार ठेवण्यासह किचन स्वच्छ ठेवावे, कुकने आवश्यक ती काळजी घ्यावी तसेच दुकानाचा परवाना दर्शनी भागावर लावावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. भविष्यात या नियमांचे पालन न झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही डॉ. प्रदीप पवार यांनी दिला.

या मोहिमेत हायजिन फर्स्ट संस्थेचा पुढाकार होता. यावेळी संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी, रूपाली बिहानी, अनुराधा रेखी, विकास जाधव, तुषार भंडारी आदी उपस्थित होते.

हायजिन फर्स्ट संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी म्हणाल्या की, प्रोफेसर कॉलनी चौक हा 'हायजिन चौक' करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.



अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खाद्यपदार्थांच्या स्टॉलची तपासणी करून संबंधित व्यवसायिकांना स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

नगरकरांना स्वच्छ, सुरक्षित आणि हायजिनिक खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था शहरात सातत्याने काम करत आहे. खाद्यपदार्थ व्यवसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृती करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे वैशाली गांधी यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खाद्यपदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची असून त्याचे कौतुक केले पाहिजे.

हायजिन फर्स्ट संस्था गेल्या अकरा वर्षांपासून शहरातील नागरिकांना चांगले आरोग्य मिळावे, यासाठी समाजामध्ये तसेच खाद्यपदार्थ व हॉटेल व्यावसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे काम करत आहे. नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी संस्थेकडून करण्यात येणारे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे बारस्कर यांनी सांगितले.

रूपाली बिहानी म्हणाल्या की, प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांचे स्टॉल आहेत. या स्टॉलची स्वच्छता राखणे तसेच नागरिकांना चांगल्या दर्जाचे खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे ही खाद्यपदार्थ व्यावसायिकांची जबाबदारी आहे. नागरिकांना चांगले आणि स्वच्छ खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## दखल

## भरदिवसा बिबट्याचा शेळीवर हल्ला; रोहिलेवाडीत दहशत

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील रोहिलेवाडी परिसरात भरदिवसा बिबट्याने शेळीवर हल्ला केल्याने शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतात बाजरी काढण्याचे काम सुरू असताना सुमारे १० ते १५ मजूर उपस्थित असतानाच ही घटना घडली.



रोहिलेवाडी परिसरात दोन शेतांच्या मधील मोकळ्या जागेत बांधलेल्या शेळीवर बिबट्याने अचानक झडप मारली. शेळीला जबड्यात पकडून बिबट्या तिला जवळच्या उसाच्या शेतात घेऊन गेला. हा प्रकार लक्षात येताच महिला व शेतमजुरांनी आरडाओरड करत उसाच्या शेताकडे धाव घेतली. मजुरांची चाहूल लागताच बिबट्याने शेळीला सोडून तेथून पळ काढला.यानंतर मजुरांनी जखमी शेळीला बाहेर काढले. बिबट्याच्या हल्ल्यात शेळीच्या जबड्याला गंभीर दुखापत झाली आहे. शेतकरी व मजुरांनी तातडीने डॉक्टरांना बोलावून तिच्यावर उपचार केले. मात्र, शेळीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.रोहिलेवाडी परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने शेतकरी, महिला व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शेतात काम करण्यासाठी जाणेही धोकादायक ठरत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी वन विभागाने तातडीने पाहणी करून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.यावेळी ज्येष्ठ शेतकरी छबनराव रोहिले, खंडू पवार, नवनाथ येडे, नाणेकर यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी वन विभागाकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू



**कवठे येमाई :** राज्यातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजना, कृषी कर्ज, पीकविमा, कृषी निविष्ठा आणि कृषी विस्तार सेवांचा लाभ सुलभतेने मिळावा, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६ अंतर्गत कृषी विभागाने ऑनलाइन अर्जासाठी पोर्टल सुरू केले आहे. याबाबत कवठे येमाई विभागाचे कृषी सहायक अधिकारी नंदू जाधव यांनी माहिती दिली.

महिला शेतकऱ्यांना अधिकृत मान्यता देणे, प्रमाणपत्र वितरित करणे आणि त्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि शेती व्यवसायात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिला प्रमाणपत्रासाठी पात्र ठरणार आहेत.

ऑनलाइन अर्ज केल्यानंतर तो संबंधित नियमित किंवा विशेष ग्रामसभेसमोर ठेवला जाईल. अर्जदार महिला अधिनियमात नमूद केलेल्या शेतीसंबंधित कामात सहभागी आहे किंवा नाही, याची ग्रामसभा पडताळणी करणार आहे. त्यानंतर अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय घेतला जाईल. अर्ज नाकारल्यास त्याचे कारण लेखी स्वरूपात नमूद करणे आवश्यक आहे. ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांच्या आत प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. नगरपंचायत क्षेत्रातील अर्ज संबंधित सर्वसाधारण सभेसमोर ठेवून निर्णय घेतला जाणार आहे.

**जमीनमालकीपुरते शेतीचे निकष मर्यादित नाहीत**

अधिनियमात 'शेती'ची व्याप्ती व्यापक ठेवण्यात आली आहे. पीक लागवड, बियाणे उत्पादन, पशुपालन, मत्स्य व्यवसाय, मधमाशी पालन, दुग्ध व्यवसाय, फुलशेती, चारा लागवड, फलोत्पादन, कुक्कुटपालन, रेशीम शेती, गांडूळ खत निर्मिती, वनोपज संकलन व विक्री, शेतीमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन, भाजीपाला उत्पादन, स्थलांतरित शेती तसेच शेतमजुरी यांचाही त्यात समावेश आहे.

महिला शेतकऱ्यांचे शेतीतील योगदान लक्षात घेऊन त्यांना अधिकृत ओळख मिळावी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ सुलभ व्हावा, यासाठी हे प्रमाणपत्र महत्त्वाचे ठरणार असल्याचे नंदू जाधव यांनी सांगितले. कृषी विभागाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत अधिनियमाची अंमलबजावणी, पात्र महिलांची ओळख, ऑनलाइन अर्जासाठी प्रोत्साहन, प्रशिक्षण आणि जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे.

## लोणी-धामणी परिसर दुष्काळग्रस्त जाहीर करा

### पूर्व आंबेगावातील पहाडदरा , शिरदाळे, धामणी, लोणी, वडगावपीर, मांदळेवाडी येथील शेतकऱ्यांची मागणी;

**लोणी धामणी :** पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त म्हणून शासनाकडून विचार करण्यात आला असताना आंबेगाव तालुक्याचा समावेश न झाल्याने पूर्व भागातील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विशेषतः लोणी, धामणी, शिरदाळे, पहाडदरा, वडगावपीर व मांदळेवाडी या गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने या गावांचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावे, अशी मागणी वडगावपीरचे माजी सरपंच संजय पोखरकर, मांदळेवाडी सरपंच उज्ज्वला आदक, लोणी सरपंच सावळेराम नाईक, धामणी सरपंच प्रतिक्षा जाधव, पहाडदरा सरपंच मच्छिंद्र वाघ, शिरदाळे सरपंच सुप्रिया तांबे यांनी केली.

या परिसराला घोडनदीच्या पाण्याचा पुरेसा लाभ मिळत नसून डिंभे उजव्या कालव्याचे पाणीही अनेक भागांतील शेतीपर्यंत पोहोचलेले नाही. त्यामुळे पावसाने ओढ दिल्यास खरीपाबरोबरच रब्बी हंगामातील पिकांवरही त्याचा मोठा परिणाम होतो.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाची अनिश्चितता कायम राहिल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. खरीप पिके कशीबशी हातात येत असताना रब्बी हंगामासाठी आवश्यक असलेला दमदार पाऊस लांबणीवर पडल्याने ज्वारीसह अन्य रब्बी पिकांच्या पेरण्यांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाणीटंचाईमुळे जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

**शासनाने गावनिहाय परिस्थिती तपासावी**

दुष्काळ जाहीर करताना पावसाचे प्रमाण, पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, सिंचनाची साधने, पीकपाणी परिस्थिती आणि शेतकऱ्यांवरील परिणाम या सर्व बाबींचा वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्याचा संपूर्णपणे दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाला नसला, तरी पूर्व भागातील प्रत्यक्ष दुष्काळी परिस्थिती असलेल्या गावांचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन पात्र गावांना दुष्काळी सवलती लागू कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# बाजारभावातील चढ-उतारामुळे शेतकरी संभ्रमात

## मजुरांचा तुटवडा; शेतकऱ्यांची कांदा उत्पादनाकडे पाठ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** महाराष्ट्रात नाशिक तसेच पुणे जिल्हे कांदा उत्पादनासाठी नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. पुणे जिल्ह्यातील कांद्याला पूर्वी 'फुरसुंगी वाण' म्हणून विशेष ओळख मिळाली होती. मात्र, बाजारभावातील सातत्याने होणारे चढ-उतार, वाढता उत्पादन खर्च आणि आता जाणवणारा मजुरांचा तुटवडा यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी कांदा उत्पादनाकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे. सध्या तुरळक ठिकाणीच कांदा लागवड होत असून, पावसाळी हंगामातील कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.

मागील काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांनी जमिनीची मशागत करून घेतली आहे. वाफे व बेड तयार करून कांदा लागवडीला सुरुवात झाली आहे. मात्र, सध्या पुन्हा वळवाचे वातावरण तयार झाल्याने लागवड केलेली रोपे वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. त्यातच कांदा बियाण्यांच्या दरातही वाढ झाली आहे.

**बाहेरगावाहून मजूर आणण्याची वेळ :**

यंदा परिसरात कांदा लागवडीसाठी मजुरांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बाहेरगावातून मजूर आणून कांदा लागवड करावी लागत आहे. मजुरीचे दर वाढल्याने उत्पादन खर्चातही मोठी भर पडत आहे.सध्या एका दिवसासाठी पाचशे रूपये मजुरी द्यावी लागत आहे मधल्या काळात पडलेल्या तीव्र उन्हामुळे कांद्याच्या रोपांचे मोठे नुकसान झाले असून, उपलब्ध रोपांमधून लागवड उरकण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे.

> सध्या महागाईचा आगडोंब झाला आहे खाद्यतेल, गॅस दैनंदिन जीवनावश्यक वस्तू सर्व महागले आहे अशातच मुलांच्या शिक्षणाचा खर्च यामुळे आंम्हाला देखील घरखर्च भागवताना मोठी कसरत करावी लागते.
>
> -कुसुम माकर, रेखा माकर

वीजपुरवठ्याच्या वेळापत्रकानुसार पाणी देण्याचे नियोजन करावे लागत असल्याने कांदा लागवडीची कामेही त्यानुसार करावी लागत आहेत. पाऊस, वीज, मजूर आणि वाढता खर्च या सर्वच बाबींचे नियोजन करताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे.

**एकरी खर्च ५० हजारांच्या पुढे**

कांदा पिकासाठी नांगरणी, रोटरणी व वाफे तयार करण्यासाठी सुमारे चार हजार रुपये, वाफे ओढण्यासाठी पाच हजार रुपये, कांदा लागवडीच्या मजुरीसाठी सुमारे अकरा हजार रुपये, शेणखत व रासायनिक खतांसाठी सुमारे वीस हजार रुपये, औषध फवारणीसाठी दहा हजार रुपये आणि खुरपणीसाठी सुमारे दहा हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे कांद्याचा एकूण उत्पादन खर्च एकरी साधारण पन्नास हजार रुपयांच्या पुढे जात आहे.एकीकडे उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना दुसरीकडे कांद्याच्या बाजारभावात वेळोवेळी मोठे चढ-उतार होत आहेत. त्यामुळे पूर्वी शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे मिळवून देणारे कांदा पीक आता बेभरवशाचे ठरत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. वाढता खर्च, मजुरांची कमतरता आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे कांदा लागवडीबाबत शेतकरी सावध भूमिका घेत आहेत.



दिवे, ता. पुरंदर येथे कांदा लागवड करताना महिला शेतकरी.

## कातकरी समाजातील ३१० लाभार्थ्यांना जातीचे दाखले व रेशनकार्डचे वितरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जनजाती कल्याण आश्रम आणि सेवा सहयोग फाउंडेशन, पुणे यांच्या प्रयत्नातून तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, तहसील कार्यालय खेड आणि पंचायत समिती खेड यांच्या समन्वयातून विठ्ठलवाडी येथे ३१० लाभार्थ्यांना जातीचे दाखले व रेशनकार्डचे वितरण करण्यात आले.



खेड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात रेशनकार्ड व जातीचे दाखले वितरित करण्यात आले.या उपक्रमामुळे कातकरी समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास मदत झाली.

नाशिक जनजाती कल्याण आश्रमाचे सचिव शरद शेळके, प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रियंका घनवट, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगावचे वरिष्ठ आदिवासी निरीक्षक शरद काळे, जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ चौरे उपस्थित होते.श्री. शेळके यांनी मार्गदर्शनात हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या बलिदानाचा तसेच आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतींना अभिवादन करत आदिवासी समाजातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. उमा वाघ यांनी केले, तर घोडेगाव आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल रेणुका जाधव यांनी आभार मानले.कार्यक्रमास अरुण काठे, शिवाजी चौरे, कैलास भालेकर, रेखा मराडे, योगेश चपटे, श्री. नितीन खरात, चिंतामण वडेकर, तुकाराम भांगरे, आदित्य जोशी, यांच्यासह जनजाती कल्याण आश्रमाचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काळभैरवनाथ मंदिराच्या विकासकामांचे खासदार निलेश लंके यांच्याकडून कौतुक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांनी तीर्थक्षेत्र खामुंडी, ता. जुन्नर येथील जागृत देवस्थान काळभैरवनाथ मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिर परिसराची तसेच सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली.

मंदिराच्या बांधकामाची माहिती त्यांनी देवस्थान विश्वस्त मंडळाकडून जाणून घेतली. छोट्याशा गावाने एकजुटीच्या बळावर मंदिराचा केलेला कायापालट आणि सुरू असलेली विकासकामे कौतुकास्पद असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.



यावेळी काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने खासदार लंके यांचा सन्मान करण्यात आला. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संदीप गंभीर, विश्वस्त उपेंद्र डुंबरे, गणपत कोकाटे, शांतराम बोडके, विश्वजीत डुंबरे, माजी सरपंच सत्यवान डुंबरे, सह्याद्री पोलिस अकॅडमीचे मयूर डुंबरे, सुभाष कोकाटे, केशव क्षीरसागर तसेच खामुंडी येथील तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माळशेज घाटात 'रानभाजी महोत्सव' उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कृषी विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (चद्भूउ), वन धन केंद्र आणि ऋषिकेश परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने माळशेज घाट परिसरात 'रानभाजी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले.पारंपरिक रानभाज्यांचे महत्त्व आणि त्याचे ज्ञान स्थानिक पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आदिवासी बांधव व महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरला आहे.

माळशेज घाटाच्या निसर्गरम्य वातावरणात भरविण्यात आलेल्या या महोत्सवाचा मुख्य उद्देश पारंपरिक रानभाज्या, आदिवासी खाद्यसंस्कृती आणि स्थानिक उत्पादनांचे संवर्धन करणे हा होता. महोत्सवात ३५ ते ४० प्रकारच्या विविध, दुर्मिळ आणि पौष्टिक रानभाज्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते.या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे दर्शन न घडविता आदिवासी महिला लाभार्थी आणि स्थानिक महिला बचत गटांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहितीही देण्यात आली. त्यामुळे महिला सक्षमीकरणासह स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास या उपक्रमाची मदत झाली.स्थानिक रानभाज्यांना बाजारपेठ, आदिवासी खाद्यसंस्कृतीला व्यासपीठ आणि महिला बचत गटांना रोजगाराची संधी देणारा हा उपक्रम माळशेज घाटातील पर्यटकांसाठीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.महोत्सवाला राज्यपाल नियुक्त सल्लागार ॲड. किरण गभाले, पुणे जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती तुळशीराम भोईर, युवराज लांडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विष्णू गाडेकर, शंकर अण्णा कुमकर, ऋषिकेश परिवाराचे अध्यक्ष सुरेश जोशी, खूबीचे सरपंच श्री. काटे, पारगावचे उपसरपंच विनायक चकवे यांच्यासह एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## पुणे जिल्ह्यात लोकाभिमुख उपक्रमांना गती

### मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा थेट लाभ मिळवून देणे, ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित कामांचा निपटारा करणे तसेच गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

अभियानांतर्गत जन्म-मृत्यू नोंदणी, विविध दाखले व प्रमाणपत्रे, आयुष्मान भारत कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्रे तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या माध्यमातून नागरिकांना शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे.

गावांतील शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी तसेच अन्य सार्वजनिक संस्थांमधील मूलभूत सुविधांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, स्वच्छता, संरक्षण भिंत, परसबाग तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**जलसंधारण, स्वच्छता व पर्यावरण संवर्धनावर भर :**

अभियानाच्या माध्यमातून जलस्रोतांची स्वच्छता, जलसंधारण, पाणीपुरवठा व वैयक्तिक नळजोडणी, घनकचरा व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण आणि उपजीविकेशी संबंधित उपक्रमांनाही अभियानात महत्त्व देण्यात आले आहे. आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण व ॲनिमियाबाबत जनजागृती, महिला आरोग्य व स्वच्छता, बचत गटांचे सक्षमीकरण तसेच महिला शेतकरी उत्पादक संस्थांशी संबंधित उपक्रम राबविण्यात येणार आहेत.प्रत्येक ग्रामपंचायतीत स्थानिक गरजेनुसार ठोस व दृश्यमान बदल घडवून आणण्यासाठी 'वन जीपी-वन व्हिजिबल चेंज' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, योग-ध्यान सत्र, प्लास्टिकमुक्ती, रस्ता सुरक्षा, जलसंधारण, कचरा वर्गीकरण, सायबर सुरक्षा, मतदार जागरूकता आणि शासकीय योजनांची माहिती देण्यासारख्या विविध उपक्रमांचा त्यात समावेश आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील १ हजार ३९९ ग्रामपंचायतींमध्ये या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

अभियानाच्या कालावधीत स्वामित्व नकाशे व चौकशी नोंदवह्यांचे वाटप, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनदांचे वितरण, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील घरकुलांचे वाटप व गृहप्रवेश, प्रलंबित बांधकाम परवानग्या व ना-हरकत दाखल्यांचा निपटारा, वैयक्तिक नळजोडणीसाठी विशेष मोहीम तसेच कृषी योजनांसाठी ऑनलाइन नोंदणी यांसारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.याशिवाय ५ हजार नवीन महिला बचत गटांची स्थापना व बँक खाती उघडणे, प्रत्येक तालुक्यात किमान १०० लाभार्थींच्या घरांवर प्रधानमंत्री सूर्य घर योजनेअंतर्गत १ किलोवॅट क्षमतेचे सौर वीज प्रकल्प उभारणे, घनकचरा व्यवस्थापन, शाळा व अंगणवाड्यांमधील मूलभूत सुविधांची पूर्तता तसेच ई-ऑफिस प्रणालीचा वापर वाढविणे यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.१७ सप्टेंबर रोजी प्रमुख सार्वजनिक ठिकाणी जनकल्याणकारी योजना, राष्ट्रीय प्रतीके आणि विकसित भारताच्या संकल्पनेवर आधारित मानवी रांगोळीचे आयोजन करण्यात येणार आहे. २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान शासकीय व खासगी शाळांमध्ये 'विकसित भारत संकल्प' या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

## दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टची गणेश विसर्जन मिरवणुकीत सलग ३२ तास वैद्यकीय सेवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सुसज्ज रुग्णवाहिका, औषधांचा पुरेसा साठा, डॉक्टरांचा आणि स्वयंसेवकांचा ताफा अशा तयारीनिशी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन मिरवणुकीत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने सलग ३२ तास वैद्यकीय सेवा पुरविली, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आज (रविवारी) दिली.

वैद्यकीय सेवेसाठी १५ जणांचे वैद्यकीय पथक होते. तसेच ५ रुग्णवाहिका, २ कॉर्डिॲक रुग्णवाहिका आणि औषध वाटपासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका अशी यंत्रणा कार्यरत होती. लक्ष्मी रस्त्यावरील बेलबाग चौक ते डेक्कन जिमखाना येथील पांचाळेश्वर घाट या मार्गावर ही सेवा तैनात ठेवली होती. ३५ रुग्णांना ट्रस्टच्या रुग्णवाहिकेचा लाभ मिळाला आणि ३६७ भाविकांवर प्राथमिक उपचार करण्यात आले. ट्रस्टची रुग्णसेवा दिलासादायक होती, असे रासने यांनी पत्रकात म्हटले आहे.

वैद्यकीय सेवेसाठी अपोलो हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल आणि बंधन बँक यांचे सहकार्य ट्रस्टला मिळाले. या वैद्यकीय सेवेचे नियोजन ट्रस्टचे सर्व विश्वस्त आणि सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले असून, त्याचे व्यवस्थापन ट्रस्टचे वैद्यकीय सेवा प्रमुख राजेंद्र परदेशी आणि त्यांचे सहकारी यांनी पाहिले. अशी माहिती सुनील रासने यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.



## द • ख • ल



### कृभकोची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवी दिल्ली येथे संपन्न

**हातगाव :** देशातील प्रमुख खत उत्पादक कृषक सहकारी संस्थांपैकी एक असलेल्या कृषक भारती कोऑपरेटिव्ह लिमिटेड (कृभको) ने आर्थिक वर्ष २०२५ – २६ मध्ये ८२४.६८ कोटींचा करपूर्व नफा नोंदविला. संस्थेने वर्षासाठी आपल्या सदस्य सहकारी संस्थांच्या इक्विटी भांडवलावर २० टक्के लाभांश जाहीर केला.संस्थेची वार्षिक खाती २५ सप्टेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथील अशोक हॉटेलमध्ये आयोजित ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आली. अशी माहिती कुभकोचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रतिनिधी सुदर्शन पाटील यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, नुकत्याच पार पडलेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी कृभकोचे अध्यक्ष व्ही. सुधाकर चौधरी होते. बैठकीला संचालक मंडळाचे सदस्य तसेच देशभरातील विविध सदस्य सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आर्थिक वर्ष २५ – २६ मध्ये कृभकोने उल्लेखनीय उत्पादन कामगिरी केली. कृभकोची पूर्ण मालकीची उपकंपनी कृभको ॲग्री बिझनेस लिमिटेड (केएबीएल) देखील महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. (केएबीएल) ने आर्थिक वर्ष २०२५ – २६ मध्ये १,९१९.३५ कोटींची उलाढाल नोंदवली. यामध्ये देशांतर्गत व्यवसायाचा १,४३६.८१ कोटींचा, तर निर्यात विक्रीचा ४८२.५४ कोटींचा वाटा होता. दरम्यान, कृभको ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड (केजीइपीएल) गुजरातमधील हजीरा आणि आंध्र प्रदेशातील नेल्लोर येथे दोन प्रकल्प उभारत आहे. हे दोन्ही प्रकल्प आर्थिक वर्ष २०२६ – २७ मध्ये कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

### रामेश्वरदास विद्यालयाच्या हर्षवर्धन भोसलेची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**हातगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहीगाव – ने संचालित शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील श्री रामेश्वरदासजी विद्यालयातील हर्षवर्धन भोसले या विद्यार्थ्याची नुकतीच जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक आयुब सय्यद यांनी दिली आहे. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व शेवगाव क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत १७ वर्ष वयोगटा मध्ये ७१ किलो वजन गटात हर्षवर्धन अभिजीत भोसले यांनी फायनल कुस्ती मारून जिल्हास्तरीय निवड सिद्ध केली या खेळाडूचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार डॉक्टर नरेंद्रजी घुले पाटील साहेब माजी आमदार चंद्रशेखरजी घुले पाटील साहेब शेवगाव पंचायत समितीचे माजी सभापती डॉक्टर क्षितिज घुले पाटील साहेब जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ राजश्री ताई घुले पाटील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माननीय शिवाजीराव पाटील संस्थेचे प्रशासकीय अधिकारी माननीय के वाय नजन सर समन्वयक विजय काशीद सर विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय आयुब सय्यद सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या विजयी खेळाडूस उपमहाराष्ट्र केसरी विजेते माननीय युवराज भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड




**राशीन :** अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तात्यासाहेब माने यांची निवड करण्यात आली आहे. कैकाडी तसेच भटक्या-विमुक्त समाजाच्या प्रश्नांसाठी गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सातत्याने संघर्ष करणाऱ्या माने यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या निवडीस राज्य सरचिटणीस गोरख माने, राज्य संघटक विनोद जाधव, राज्य उपाध्यक्ष विश्वासराव माने, मोहनराव जाधव, सुधाकर जाधव, शेखर जाधव, किसनराव जाधव, संजूबाबा गायकवाड, बाळासाहेब माने, लक्ष्मण माने, अनिलराव जाधव, लक्ष्मण गायकवाड, राज्य महिला उपाध्यक्ष संगीताताई माने, राज्य महिला सचिव रेखाताई माने, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष जीत कोरवी, उपाध्यक्ष संजय माने, महिला उपाध्यक्ष कमल जाधव, महिला सचिव ललिता मॅडम, युवक अध्यक्ष राजेंद्र माने, तसेच गिरीधर कोरवी, शीला माने, शशिकला जाधव यांच्यासह राज्यातील पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. तात्यासाहेब माने यांच्या निवडीबद्दल सुरेशराव जाधव, जालिंदर जाधव, नितीन माने, विनोद जाधव, किरण जाधव, संजय माने, मच्छिंद्र माने, दिलीप जाधव, मच्छिंद्र जाधव, बाळासाहेब जाधव, पिंटू माने, विशाल माने यांच्यासह समाजबांधवांनी अभिनंदन केले.

### शहरटाकळी विद्यालयाच्या स्नेहल खरडची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**शहरटाकळी :** तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा तालुका क्रीडा संकुल शेवगाव येथे सुरू असून यामध्ये कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ८ वीची विद्यार्थिनी कु. स्नेहल विजय खरड हिने ४६ किलो वजन गटामध्ये खेळताना जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या बळावर तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत उत्तुंग यश संपादन करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक आदिनाथ काटे, किरण कुढेकर , सहशिक्षिका कमल तुळसे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. स्नेहलच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड.डॉ. विद्याधरजी काकडे साहेब, विश्वस्त व मा.जि.प.सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.लक्ष्मण बिटाळ, उपमुख्यकार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे, प्राचार्या अंजली चिंतामण,पर्यवेक्षक पोपट खताळ व सर्व शिक्षक बंधू भगिनी व पालक यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बुधवारपर्यंत निर्णय घ्या, अन्यथा शेतकरी रस्त्यावर!

## तलावातील पाणी वापराची बंदी उठवा; शेतीपंपांचा वीजपुरवठा पूर्ववत करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना तलावांमध्ये पाणी उपलब्ध असूनही त्याचा शेतीसाठी वापर करण्यावर बंदी, त्यातच शेतीपंपांचा बंद केलेला वीजपुरवठा आणि कर्जमाफीच्या प्रश्नामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करत रविवारी कोळगाव फाटा येथील कांडेकर लॉन्स येथे शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. बुधवारपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास सर्वपक्षीय आंदोलन छेडून रस्त्यावर उतरण्याचा इशारा या बैठकीत देण्यात आला.

विसापूर, मोहरवाडी, घोटवी, पारगाव, औटेवाडी, घोडेगाव, देऊळगाव यासह विविध तलावांमध्ये पाणी उपलब्ध असतानाही शेतकऱ्यांना त्याचा शेतीसाठी वापर करता येत नसल्याचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. दुसरीकडे शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद केल्याने उभी पिके धोक्यात आली आहेत. पाणी असूनही पिकांना पाणी देता येत नाही



आणि वीज असूनही पंप चालवता येत नाही, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कर्जमाफीची पात्रता, अटी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबतही शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

बैठकीदरम्यान आमदार विक्रम पाचपुते यांनी दूरध्वनीद्वारे शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के आणि उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधला. सध्या आंदोलनाची भूमिका घेऊ नये. मंगळवारी महसूल मंत्र्यांसोबत कॅबिनेट बैठक होणार असून बुधवारपर्यंत प्रशासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करावी; त्यानंतर सर्वजण मिळून पुढील निर्णय घेऊ, असे आवाहन पाचपुते यांनी केले.

माजी जिल्हा परिषद सदस्य हेमंत नलगे यांनी, आमच्या भागातील शेतकरी तलावातील पाण्यावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत पाणी आणि वीज वापरू दिली नाही, तर हातातोंडाशी आलेली पिके हातातून जातील. प्रशासनाने तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे, असे सांगितले.

जिल्हा परिषद सदस्य दिनूकाका पंधरकर यांनी शासनाच्या निर्णयाचा निषेध करत पक्षीय मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरू, असा इशारा दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हरिदास शिर्के यांनी शासनाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील फरकावर बोट ठेवत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. प्रशांत दरेकर यांनीही पाणी व वीज प्रश्नावर सर्वांनी एकत्र येऊन लढा उभारण्याची गरज व्यक्त केली.

शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के म्हणाले, शेतकऱ्यांवर अतिशय कठीण परिस्थिती ओढवली आहे. तलावात पाणी उपलब्ध असतानाही त्याच्या वापरावर बंदी आहे. त्याचवेळी शेतीपंपांचे वीज कनेक्शन बंद केल्याने उभी पिके जळून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## दुष्काळ निवारणासाठी राशीनमध्ये भक्तिभावाने चंडीयाग; जगदंबा देवीच्या चरणी पावसासाठी साकडे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडावा, दुष्काळाचे संकट दूर व्हावे आणि शेतकरी, पशुधन व सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळावा, या मंगलमय भावनेतून राशीन येथील श्री जगदंबा देवी मंदिराच्या सिंहाच्या आवारात शनिवारी (दि. २६ सप्टेंबर) भक्तिमय वातावरणात हवनयुक्त चंडीयाग, महादेवाचा रुद्राभिषेक व वरुणदेवता पूजन करण्यात आले.



श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्र, अहिल्यानगर दक्षिण विभाग आणि श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्ट, राशीन यांच्या वतीने सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत या धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते. मंत्रोच्चार, हवनकुंडातील अग्निहोत्र आणि भक्तिभावाने करण्यात आलेल्या पूजनामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

या धार्मिक सेवेसाठी राशीन, कर्जत, मिरजगाव, माहिजळगाव, घोगरगाव, जामखेड, श्रीगोंदा, बीड, दौंड, करमाळा, भिगवण, बारामती तसेच अहिल्यानगर शहर आदी विविध भागांतून महिला-भगिनी व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुमारे ७०० भाविकांनी या धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला. चंडीयागाच्या माध्यमातून दुष्काळ निवारणासाठी तसेच वरुणराजाची कृपादृष्टी लाभून सर्वत्र भरपूर पाऊस पडावा, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

महादेवाच्या रुद्राभिषेकासह वरुणदेवतेचे पूजन करून श्री आई जगदंबा देवी आणि श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी साकडे घालण्यात आले. पाऊस भरपूर पडू दे, धरती हिरवीगार होऊ दे आणि शेतकरी सुखी होऊ दे या सामूहिक भावनेने पार पडलेल्या या धार्मिक उपक्रमातून राशीनसह कर्जत तालुका आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी सुख-समृद्धी व जलसमृद्धीची प्रार्थना करण्यात आली.

## श्रीगोंद्यात बालविवाहाचा विळखा; यंत्रणा कुठे?

### वैद्यकीय यंत्रणा, ग्रामपातळीवरील अधिकारी आणि पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** बालविवाह रोखण्यासाठी शासनाने कायदा आणि विविध यंत्रणा उभारल्या असतानाही श्रीगोंदा तालुक्यात बालविवाहाची प्रथा अद्याप पूर्णपणे हद्दपार झालेली नसल्याचे चित्र आहे. अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांना वेळेवर माहिती मिळते का, मिळाल्यानंतर कारवाई होते का, याबाबतच प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे 'बालविवाह जोमात, प्रशासन कोमात' अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

अल्पवयात विवाह आणि त्यानंतरचे मातृत्व यामुळे मुलींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. विशेषतः किशोरवयीन मातांच्या गर्भधारणेत आरोग्यविषयक गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे बालविवाह हा केवळ सामाजिक कुप्रथा नसून बालिकांच्या भवितव्याशी आणि आरोग्याशी निगडित गंभीर प्रश्न आहे. अल्पवयीन मुलींची वैद्यकीय तपासणी किंवा उपचार होत असताना संबंधित माहिती प्रतिबंधक यंत्रणेपर्यंत वेळेत पोहोचते का, याची तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. सोनोग्राफी केंद्रांसह सरकारी व खासगी वैद्यकीय संस्थांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे प्रशासनाला संभाव्य बालविवाहाची प्रकरणे वेळेत ओळखता येऊ शकतात. मात्र माहिती मिळूनही ती पुढे जात नसेल किंवा कुठे दडपली जात असेल, तर त्याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. बालविवाह रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, तंटामुक्ती समिती, अंगणवाडी, आशा कार्यकर्त्या, शिक्षक आणि पोलीस यांच्यात प्रभावी समन्वय अपेक्षित आहे. एखाद्या अल्पवयीन मुलीचा विवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असताना, यंत्रणा निष्क्रिय राहिल्यास कायद्याच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुक्यातील संवेदनशील गावांची स्वतंत्र पाहणी, विवाहपूर्व वय पडताळणी, जन्मनोंदणीची तपासणी आणि संशयित विवाहांवर तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची गरज आहे. बालविवाह झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा तो होण्यापूर्वी रोखणे हीच प्रशासनाची खरी परीक्षा आहे.

**जनजागृतीपेक्षा 'प्रतिबंधात्मक कारवाई' महत्त्वाची**

बालविवाह निर्मूलनासाठी केवळ बैठका, जनजागृती आणि कागदी अहवाल पुरेसे नसून गावागावांत प्रत्यक्ष देखरेख आणि तातडीची कारवाई आवश्यक आहे. अल्पवयीन मुलींचे बालपण विवाहाच्या मंडपात संपण्याआधी प्रशासनाने जागे होणे गरजेचे आहे.

## प्रशासन शेवटच्या घटकापर्यंत लाभ देण्यास कटीबद्ध : प्रांताधिकारी नितीन पाटील

### कर्जतमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** प्रशासन आणि सर्वसामान्य जनता लोकशाहीचा अविभाज्य घटक असून सरकारच्या सर्व योजना प्रत्यक्ष गरजवंत लाभार्थ्यांपर्यंत कसे पोहचली जातील यासाठी सर्वांनी कटीबद्ध असले पाहिजे. सर्वसामान्य जनता केंद्रस्थानी ठेवत प्रशासनाने दारी जात गरजवंत लाभार्थी शोधत त्यांच्या अडी-अडचणी, समस्याचे निराकरण केल्यास लोकशाही आणखी सदृढ होण्यास हातभार लागतो. यासाठी प्रशासन देखील तितकेच तत्पर असायला हवे असे आवाहन कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले. ते कर्जत येथे छत्रपती शिवाजी महाराज सेवा शिबीर कार्यक्रमात बोलत होते.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या सेवाकाल पूर्णतेच्या निमित्ताने राज्य शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी अहिल्यानगर, उपविभागीय अधिकारी कार्यालय कर्जत आणि तहसील विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात सर्वत्र सेवा संकल्प अभियान आयोजित केले जाणार आहे. सदर सेवा संकल्प अभियानांतर्गत गुरुवारी कर्जत तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न झाले.

याप्रसंगी कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर कर्जत तहसील कार्यालयात तालुका प्रशासनातील सर्व प्रशासकीय विभागांनी सहभाग घेत गरजवंत लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ पत्र वितरीत केले.

यावेळी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, कृषी विभाग तसेच इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कर्जतचे तहसीलदार रवी सतवन यांनी विविध शासकीय योजनेची माहिती उपस्थितांना दिली.

यात त्रुटी आढळल्यास शासन पुन्हा एकदा लाभार्थ्यांस संधी देत असले तरी लाभार्थ्यांनी आपले अर्ज परिपूर्ण कसे राहील याकडे देखील लक्ष दिले पाहिजे असे आवाहन केले. शेवटी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## राशीन बसस्थानकाच्या प्रश्नांवर सोनवणे आक्रमक

### मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** राशीन बसस्थानकातील विविध मूलभूत सुविधा, प्रवाशांची सुरक्षितता, विद्यार्थिनींसाठी अतिरिक्त बससेवा, नवरात्रोत्सवातील भाविकांसाठी अतिरिक्त एसटी फेऱ्या तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात अधिकृत बसथांबा सुरू करण्याच्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

या मागण्यांसंदर्भात सोनवणे यांनी २५ सप्टेंबर रोजी कर्जत आगार व्यवस्थापकांना निवेदन दिले आहे. राशीन ते कर्जत मार्गावर विद्यार्थिनींसाठी गर्दीच्या वेळेत अतिरिक्त बससेवा सुरू करावी, नवरात्रोत्सवाच्या काळात श्री जगदंबा देवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त एसटी बसफेऱ्या सोडाव्यात, तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात अधिकृत बसथांबा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच बसस्थानक परिसरातील अपुऱ्या स्ट्रीट लाईटची व्यवस्था, खड्डे बुजविणे, पाण्याचा निचरा, नियमित स्वच्छता, वाढलेली वेडी बाभूळ व झाडे-झुडपे हटविणे, महिलांचे शौचालय सुरू करणे, पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, बंद असलेले फिल्टर व उद्घोषणा यंत्रणा सुरू करणे, अशा विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

**मागण्या प्रलंबित राहिल्यास उपोषणाचा इशारा**

या सर्व मागण्यांवर प्रशासनाकडून ठोस कार्यवाही न झाल्यास २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता राशीन बसस्थानकाच्या गेटसमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दत्तात्रय सोनवणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# जेऊर-डोंगरगणचा अंधार अखेर जनता दरबारात!

## आ. अक्षय कर्डिलेंच्या महावितरणला सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** जेऊर पंचक्रोशीतील जेऊर-डोंगरगण सर्केटवर वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. अखेर हा प्रश्न आमदार अक्षय कर्डिले यांच्या जनता दरबारात पोहोचला. जेऊर परिसरातील तरुणांनी रविवारी ( दि. २७) भेडसावणाऱ्या विजेच्या लपंडावाची व्यथा आमदार कर्डिले यांच्यासमोर मांडली. याची तातडीने दखल घेत कर्डिले यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या.

**तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना! : तोडमल**

जेऊर-डोंगरगण सर्केटवरील विजेच्या लपंडावाची समस्या आमदार अक्षय कर्डिले यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. वीजपुरवठ्यात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आता महावितरणने तातडीने कार्यवाही करून वीजपुरवठा सुरळीत करावा.

जेऊर-डोंगरगण विद्युत सर्केटवर रात्री तसेच पहाटे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेटे वस्ती, लिगाडे वस्ती, तोडमल वस्ती, डोंगरगण यासह पंचक्रोशीतील अनेक वाड्या-वस्त्यांना त्याचा फटका बसत आहे. प्रचंड उकाडा, डासांचा उपद्रव आणि बिबट्याच्या दहशतीच्या पार्श्वभूमीवर रात्री अंधार पसरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. वीज नसल्याने



विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून गणेशोत्सवाच्या काळातही रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी होती. दिवसभरही विजेचा लपंडाव सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

वीजपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्यानंतर आमदार अक्षय कर्डिले यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. सर्वसामान्य जनता आणि बळीराजाला कोणत्याही परिस्थितीत त्रास होता कामा नये.

वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवावी अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी माजी उपसरपंच बंडू पवार, शरद तोडमल, सचिन म्हस्के, गोरख तोडमल, प्रणव पवार, हर्षल तोडमल, प्रथमेश तोडमल, निलेश पवार,सोहम मोरे, निलेश साठे, भागवत म्हस्के, दर्शन कोकाटे यांच्यासह जेऊर परिसरातील तरुण उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.२८ सप्टेंबर २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# प्रतिकूल परिस्थितीतही उच्चांकी ऊस गाळप करू : नरेंद्र घुले पाटील




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीटंचाईचा सामना करत ऊस उत्पादकांनी मोठ्या कष्टाने उभे केलेले ऊस पीक अडचणीत आले आहे. त्यामुळे यंदा गळीत हंगाम लवकर सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उच्चांकी ऊस गाळप करेल, अशी ग्वाही कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी दिली.

भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची ५५वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२७) कारखाना कार्यस्थळावर झाली. अध्यक्षस्थानी नरेंद्र घुले पाटील होते.

माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आमदार पांडुरंग अभंग, उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील, ॲड. देसाई देशमुख, डॉ. क्षितिज घुले पाटील, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सरव्यवस्थापक रवींद्र मोटे आदी उपस्थित होते. नरेंद्र घुले पाटील म्हणाले, सहकारी चळवळीत पक्षभेद बाजूला ठेवून काम करावे लागते. मुळा व जायकवाडीच्या पाण्यावर शेतकऱ्यांचा पहिला हक्क असून शेतीसाठी पाणी मिळाले पाहिजे.

दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे आवश्यक आहे. सर्वांनी आपला ऊस ज्ञानेश्वर कारखान्यालाच द्यावा. गाळप चांगले झाल्यास ऊस उत्पादकांना अधिक दर देता येईल, असे त्यांनी सांगितले. आमदार लंघे म्हणाले, पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असून मुळा उजव्या कालव्याच्या आवर्तनानंतर आणखी एक आवर्तन मिळविण्यासाठी प्रयत्न करू. बॅकवॉटरवरील पंपांचे वीजजोड तोडले जाणार नाहीत, याची काळजी घेऊ, असे त्यांनी सांगितले.

माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी ऊस उत्पादनातील घट लक्षात घेता शासनाने प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी केली. कार्यक्षेत्रातील सर्व ऊसाचे गाळप करण्यास प्राधान्य देऊन ऊस दरात कारखाना अव्वल राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. कामगार संचालक सुखदेव फुलारी यांना महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी प्रास्ताविक केले. अशोकराव मिसाळ यांनी आभार मानले.

## रेल्वे उड्डाणपुलावर दोन दुचाकींची धडक; दोघे जखमी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर-नेवासा मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलावर रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. या दुर्घटनेत दोन्ही दुचाकीस्वार जखमी झाले.

भोकर येथील वाकडे व अमोलिक हे हिरो कंपनीच्या दुचाकी क्रमांक (एमएच १७ डीई ५१४५) वरून जात होते. त्याचवेळी उंदीरगाव येथील वायकर हे युनिकॉर्न दुचाकी क्रमांक (एमएच १७ सीएस ९०६९) वरून जात असताना दोन्ही दुचाकींची धडक झाली. धडकेनंतर दोन्ही दुचाकीस्वार रस्त्यावर पडून जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांनी जखमींना मदत केली. तसेच श्रीरामपूर शहर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर जखमींना रुग्णवाहिकेच्या मदतीने साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

या अपघाताचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत. दरम्यान, रेल्वे उड्डाणपुलावर वारंवार अपघात होत असल्याने या मार्गाचे रुंदीकरण करून आवश्यक सुरक्षितता उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## समृद्धी महामार्गावर उभ्या वाहनाला आयशरची धडक

### चालकाचा जागीच मृत्यू




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : शहरालगत समृद्धी महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनाला आयशरने जोरदार धडक दिल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास वैजापूर तालुक्यातील म्हस्की शिवारात घडली. राम अवध प्रसाद (वय ४५, रा. अंबरनाथ, जि. ठाणे) असे मृत चालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेंद्रा एमआयडीसी येथून आयशर वाहन (एमएच ०५ डीके १४४३) मुंबईच्या दिशेने जात होते. समृद्धी महामार्गावरील चॅनेल क्रमांक ४९३.९ जवळ महामार्गाच्या कडेला एक वाहन उभे होते. पहाटेची वेळ असल्याने आयशर चालकाला झोपेची डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज आहे. नियंत्रण सुटलेले आयशर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनावर जोरदार आदळले. या भीषण अपघातात चालक राम अवध प्रसाद यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची नोंद वैजापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरू आहे.

## पाणी प्रश्नांकडे दुर्लक्ष ; मक्तापुर ग्रामपंचायतीला महिलांनी ठोकले टाळे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मक्तापूर येथील नवीन गावठाणात गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा होत नसल्याने संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून आंदोलन केले. मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. गावठाणातील बोअरवेलमध्ये मोटार बसविण्याची मागणी ग्रामपंचायतीकडे वारंवार करण्यात आली होती. ग्रामसेवकांना सूचना करूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयात येत जाब विचारला. मात्र, पाणीप्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करत त्यांनी कार्यालयाला कुलूप ठोकले. यावेळी गणेश झगरे म्हणाले की, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून महिलांकडून पाण्याची समस्या ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आणून देण्यात येत होती. मात्र, दखल न घेतल्याने महिलांना आंदोलन करावे लागले. आगामी काळात दुष्काळी परिस्थिती अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, जलजीवन मिशनचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करून पाणीप्रश्न सोडवावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी दयाबाई सोनवणे, वर्षा साळवे, इंदुराबाई जावळे पल्लवी साळवे, मनीषा साळवे, कुसुमबाई साळवे, गाडे सोनुबाई बर्डे, भिमाबाई बर्डे, शितल बर्डे, सविता साठे, प्रियंका साळवे, कोमल हिवाळे ,अनिल साळवे,मनोज झगरे,आजिनाथ जामदार,मयूर साळवे यांच्यासह मक्तापूर ग्रामस्थ महिला उपस्थित होते.

# सोनईच्या आठवडे बाजारातून सोन्याचे गंठण चोरट्याने चोरले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : येथील काल रविवारी भरलेल्या आठवडे बाजारातून एका महिलेच्या गळ्यातील साधारणतः अडीच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण १,२५००० रु. चे चोरट्याने चोरून नेण्याची घटना बाजारात घडली त्यामुळे बाजारात खळबळ उडाली आहे.

याबद्दल माहिती की सोनई येथील शेटे गल्लीतील ज्योती प्रदीप बोकरिया ह्या नेहमीप्रमाणे रविवारी बाजाराच्या दिवशी भाजीपाला खरेदी करण्यासाठी गेल्या असता बाजार झाल्यावर घरी आल्यानंतर गळ्यातील अंदाजे ३ तोळे असलेले सोन्याचे गंठण दागिना चोरी गेल्याचे लक्षात येताच तोडचे पाणी पळाले,आजच्या बाजारभावप्रमाणे ४ लाख किमतीचे सोन आहे, परत त्याचं मार्गांवरून शोधाशोध घेतला असता दागिना सापडला नसल्याने सोनई पोलीस ठाण्यात ३०३(२) कलमनुसार तक्रार देण्यात आली आहे.

अधिक तपास सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेब तागड करत आहे. यापूर्वी नागरिकांचे महागाडे मोबाईल, रोख पैसे, महिलाच्या गळ्यातील दागिने, बाजारी वस्तू अन्य चोरीचे प्रकार चालूच असल्यामुळे कायदा -सुरक्षा व्यवस्था धोक्यात येउ पाहत आहे. दरम्यान बाजारात गुप्त पोलीस यत्रांना व सिसिटीव्ही कॅमेरेची मागणी करून याबाबद अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

# मुळा प्रवरा वीज संस्था थकबाकी वसुलीचा खेडकरांना विसर

## सभासदांना व्याजही नाही; उसनवारी कर्मचाऱ्यांना लाखोंचे मानधन

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : मुळा प्रवरा वीज सहकारी संस्थेची शेतकरी सभासद ग्राहक आणि इतर शेकडो संस्थांकडे कोट्यावधी रुपयांची थकबाकी आहे. यासाठी अवसायक राहुरीचे निबंधक रावसाहेब खेडकर यांनी अद्याप पर्यंत कोणतेच प्रयत्न केले नाही. खेडकर यांना या प्रकरणी विसर पडला आहे. उसने तोंडी बोलीवर घेतलेले कर्मचारी उपलब्ध असतानाही खेडकर यांनी ही वसुली केली नाही. जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांची खेडकर यांना मुकसंमती असल्याची सहकार प्रशासकीय वर्तुळात चर्चा आहे.

कंपनी कायदा किंवा दिवाळखोरी कायद्यानुसार जेव्हा एखादी कंपनी बंद पडते किंवा ती दिवाळखोरीत निघते तेव्हा कंपनीची सर्व मालमत्ता गोळा करणे, मालमत्ता आणि व्यवस्थापनावर ताबा मिळवणे, कंपनीची सर्व जंगम आणि स्थावर मालमत्ता रोख रक्कम बँक खाती स्वतःच्या ताब्यात घेणे, कंपनीचा व्यवसाय चालू ठेवल्याने मालमत्तेची चांगली किंमत मिळणार असेल, तर कंपनीच्या हितासाठी व्यवसाय मर्यादित काळासाठी चालू ठेवणे, कंपनीचे सर्व हिशोब, पुस्तके, कायदेशीर करार आणि महत्त्वाचे दस्तऐवज सुरक्षित ठेवणे, कंपनीला ज्यांच्याकडून पैसे येणे बाकी आहे त्यांना नोटीसा देणे, त्यांच्याकडून वसुली करणे, अवसायनाच्या प्रगतीचा अहवाल न्यायालय किंवा संबंधित प्राधिकरणाकडे सादर करणे ही व अशी मुख्य जबाबदारी अवसायकाला बहाल करण्यात येते.

### सभासदांना व्याजही नाही

संस्थेच्या स्थापनेपासून तर अलीकडच्या काही काळापर्यंत संस्थेच्या सभासदांना ठेवीवर व्याज देण्यात येत होते. यासाठी उसन्या तसेच तोंडी बोलीवर काही कर्मचाऱ्यांची नेमणूक झाली आहे. अलीकडे या सभासदांना व्याजही दिले गेले नाही. या संदर्भात शेतकरी संघटना आता जाब विचारणार आहे.

श्रीरामपूर, राहुरी तालुक्यातील संपूर्ण तर राहाता संगमनेर नेवासा या तालुक्यांतील काही गावे असे मिळून १८२ गावांचे संस्थेचे कार्यक्षेत्र होते.

शेतकरी व्यापारी कारखानदार यांच्यासह काही सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, दूध संघ, पाणीपुरवठा संस्था, स्ट्रीट लाईट, नगरपालिका वॉटर सप्लाय अशा अनेकांकडे संस्थेची कोट्यावधी रुपयांच्या थकबाक्या आहेत. खेडकर हे गेल्या काही वर्षांपासून प्रारंभी प्रशासक तर तदनंतरच्या काळात अवसायक म्हणून काम पाहत आहेत. या वसुली संदर्भात त्यांनी अद्यापही प्रयत्न केल्याचे दिसले नाही. थकबाकीदारांना कोणत्याही प्रकारच्या नोटिसा आल्या नाहीत. या कामासाठी उसनवार आणि तोंडी बोलीवर घेतलेल्या कर्मचाऱ्यांवर खेडकर यांनी लाखो रुपयांचा खर्च केला आहे. जिल्हा उपनिबंधक सुरवसे यांनी देखील खेडकर यांना याबाबत विचारपूस केली नाही.

संस्थेत सध्या सगळा सावळा गोंधळ चालू असून आता फक्त मानधन आणि सल्लागारांचीच देणी बिले येथे काढण्याची कामे तत्परतेने केली जात आहेत, त्याची सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळीत मात्र खमंग चर्चा आहे.

# कर्मवीरांचा विचार वारसा रयत शिक्षण संस्थेतून जोपासला जातो : ॲड. भगीरथ शिंदे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण होय. कर्मवीर भाऊराव पाटील यांना याची आत्मजाणीव होती. त्यामुळेच बहुजन समाजाच्या शैक्षणिक उत्थानासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीर हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचे वारसदार होते. त्यांच्या विचारातूनच पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीला दिशा मिळाली. आज रयत शिक्षण संस्थेतील शिक्षक कर्मवीरांचा विचार आणि वारसा पुढे नेत आहेत. काळानुरूप बदल स्वीकारत रयत शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य करत आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे यांनी केले. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत संकुलाच्या वतीने आयोजित कर्मवीर जयंती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. प्रमुख वक्ते रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विभागाचे सहसचिव बंडू पवार म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांना महात्मा फुले, महात्मा गांधी आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाच्या विकासाची चळवळ उभी केली. आजच्या युवकांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेऊन व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा. यावेळी मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य बाबासाहेब भोस, माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

प्रतिमापूजनानंतर श्रीमंत राजमाता कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सुमधुर स्वरात रयत गीत सादर केले. यावेळी जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्तीबद्दल गणेश भोस तर पीएच. डी. पदवी प्राप्त डॉ. देवेंद्र बहिरम यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. राजेंद्र ठाकरे यांनी संपादित केलेल्या 'भगीरथ' नियतकालिकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. अहवाल वाचन प्रा. दिलीप भुजबळ, मुख्याध्यापिका वर्षा भोईटे यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ. देवेंद्र बहिरम, प्रा. संजय फटे व प्रा. संदीप दरेकर यांनी केले. आभार पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी मानले. यावेळी सुभाषशेठ गांधी, कुंडलिकराव दरेकर, माजी विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, महावीर पटवा, रवीशेठ दंडनाईक, रत्नप्रभा बोरुडे, ज्योत्स्ना भंडारी, उद्योजक संजय मचे, नगरसेवक, मुख्याध्यापक राजेंद्र खेडकर, डॉ. ज्ञानदेव भोसले, पीटर रणसिंग, भगवान गोरखे, गणेश कविटकर तसेच पत्रकार जगताप, पत्रकार कुरुमकर उपस्थित होते.

# बोधेगावात आ. राजळेनी केली दुष्काळग्रस्त पिकांची पाहणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव** : चालू हंगामात पावसाळ्याचे ४ महिने उलटत आले असून सुद्धा पावसाने योग्य साथ न दिल्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणी केलेले खरिपाचे पूर्ण पीक वाया गेले असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाल्याचे चित्र शेवगाव तालुक्यात निर्माण झाले आहे.

मात्र अशीच परस्थिती जवळपास संपूर्ण राज्यात निर्माण झाली असल्याने व आता पावसाची शक्यता मावळली असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले असून त्यामध्ये शेवगाव तालुक्याचा समावेश असल्याने आ. मोनिकाताई राजळे यांनी शेवगाव तालुक्यातील बोधेगाव व बाळमटाकळी या २ गावात जाऊन शेतकऱ्यांच्या शेतात उभ्या असलेल्या खरिपाच्या पिकांची पाहणी केली आहे. राज्यात जे तालुके दुष्काळ म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. त्या भागातील आमदार आपल्या मतदार संघात जाऊन ठीक - ठिकाणी पाहणी करत असून. त्याचाच एक भाग म्हणून शेवगाव. - पाथर्डीच्या आमदार राजळे यांनी शेवगाव तालुक्यातील बोधेगाव व बालमटाकळी या गावातील शिवारात जाऊन तालुका पातळीवरील सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत खरिपाच्या नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान बोधेगावात संग्राम संभाजीराव देशमुख गट न ३२३ यांच्या ६० आर कपाशीची,कैलास शंकर चव्हाण गट न ३२४ यांच्याही ५८ आर कपाशी पिकाची तसेच मीराबाई राजू वाबळे गट न ३४० यांच्या १ हेक्टर तूर पिकाची पाहणी केली. बालमटाकळीतही काही शेतीचिी पाहणी केली.

शेतकऱ्यांनी घाबरून न जाता धीर धरून रहावे कारण शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नसून शासन स्तरावर तात्काळ शेतकऱ्यांना व नागरिकांना भरीव प्रकारची मदत कशी मिळेल या साठी प्रयत्न करणार आहे. या मदती निश्चितपणे मिळणार असल्याचेही यावेळी आ. राजळे यांनी सांगितले. या वेळी तहसीलदार आकाश दहाडदे,तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, मंडलाधिकारी सुवर्णा वारकड, कृषी मंडलाधिकारी दिवटे, ग्राममहसूल अधिकारी बाळासाहेब झिरपे,कृषी सहाय्यक भाऊसाहेब दगडखैर,ग्रामसेवक उद्धव जाधवर, किशोर वाबळे, संजय वीर यांच्यासह रामकाका केसभट, अशोक बाणाईत, प्रसाद पवार,मयुर हुंडेकरी,बाबू सावळकर, सुगंध खंडागळे,राजेंद्र बनसोडे,राजू कानडे, पांडुरंग तहकीक,कासममामा शेख, अशोक खिळे,संदीप देशमुख,सरपंच डॉ. बामदळे,अमोल बामदळे,मधुकर पाटेकर, भीमराज पाटेकर, बाबासाहेब वाघुंबरे, शाम राजपुरे या प्रमुख कार्यकर्त्यांसह इतरही नागरिक यांचेसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## उद्या दशक्रियाविधी

तो हसरा चेहरा, नाही कोणाला दुखावले, मनाचा तो भोळेपणा,
कधी नाही केला मोठेपणा,
उडूनी गेला अचानक प्राण,
पुनर्जन्म घ्यावा हीच आमची प्रार्थना...



### गं.भा. लताबाई बबनराव देवकर

स्वर्गवास : रविवार दि. २०/९/२०२६

कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की आमच्या मातोश्री यांचे रविवार दि.२०/०९/२०२६ निधन झाले. त्यांचा दशक्रियाविधी उद्या मंगळवार दि. २९/९/२०२६ रोजी सकाळी ८ वा. नॉर्दन ब्रँच, संगमनेर रोड, श्रीरामपूर येथे होईल. तसेच तेरावा विधी शुक्रवार दि.०२/१०/२०२६ रोजी राहत्या घरी होईल.

शोकाकुल

श्री. सोमनाथ बबनराव देवकर (मुलगा) चि. ओम सोमनाथ देवकर (नातू)
श्री. अनिल बबनराव देवकर (मुलगा) चि. सत्यम सुनिल देवकर (नातू)
श्री. सुनिल बबनराव देवकर (मुलगा) चि. साई अनिल देवकर (नातू)

समस्त देवकर परिवार, सरस्वती कॉलनी, देवकर वस्ती, श्रीरामपूर

- प्रवचनसेवा -

रामायणाचार्य ह.भ.प.प्रभाकरजी महाराज कावले (श्रीरामपूर) यांचे प्रवचन होईल.